गुरुवार, २३ मार्च २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२०३

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●THURSDAY 23 MARCH 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-203 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5









आधुनिक केसरी न्यूज

पुणे : हिंदू नववर्ष व गुढीपाडव्यानिमित्त येथील प्रसिद्ध श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात गुढीपूजन व फुलांची भव्य आरास करण्यात आली. बँडचे मंगलध्वनी, रांगोळीच्या पायघड्या आणि साखरेच्या गाठींच्या आकाराची फुलांची आकर्षक आरास अशा मंगलमय वातावरणात गुढीपाडवा मोठ्या उत्साहात साजरा झाला. पहाटेपासूनच चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या दिवशी गणरायाचे दर्शन घेण्याकरीता पुणेकरांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंह गिल्ल यांच्या हस्ते गुढीपूजन करुन गणरायाची आरती करण्यात आली. यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण, उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, विश्वस्त कुमार वांबुरे, अमोल केदारी, राजाभाऊ घोडके, मंगेश सूर्यवंशी, विलास रासकर आदींसह हजारो भाविकांची उपस्थिती होती.



# शेतकऱ्याने उभारली द्राक्षे, लसूण-कांद्याची गुढी

आधुनिक केसरी न्यूज

निफाड : हिंदू सणामधील गुढीपाडवा हा पहिला सण. या दिवशी नवीन वस्त्र, लिंबाची डहाळी यांनी गुढी उभारली जाते मात्र नैताळे येथील शेतकरी संजय साठे यांनी चक्क कांदा, लसूण व द्राक्षे यांची गुढी उभारून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. निफाड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर द्राक्षे उत्पादन घेतले जाते. मात्र मागील काही दिवसात अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने द्राक्षे पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याच्या वल्गना करीत असले तरी अद्याप नुकसानीचे पंचनामे देखील करण्यात आले नाही तेव्हा मदत तर दूरच आहे. या हंगामात कांदे मातीमोल भावात विकावे लागले होते. नैताळे येथीलच एक शेतकऱ्याने कांदा पिकावर नांगर फिरवला होता. संजय साठे हे प्रगतीशील शेतकरी असून त्यांनी बराक ओबामा यांची भेट घेऊन शेतीविषयक चर्चा केली होती. त्यांनी कांदे विकून मिळालेल्या अल्प रकमेची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मानिऑर्डर तर कधी टोपी उपरणे पाठवून त्यांनी सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला होता. त्याचप्रमाणे त्यांनी लसूण, कांदा व द्राक्षे यांची गुढी उभारून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असून तालुक्यात हा चर्चेचा विषय ठरला आहे.

गुढी हे विजय आणि समृद्धीचे प्रतीक आहे . त्यामुळे मी माझ्या शेतात पिकलेल्या द्राक्षे, कांदा व लसूण यांची गुढी उभारली आहे . अवकाळी पाऊस व गारांनी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे . शेतकऱ्यांनी खचून न जाता आजच्या नवीन वर्षापासून खंबीरपणे उभे राहून कामाला सुरुवात करावी . राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांना भरीव मदत देऊन शेतमालाला चांगला भाव कसा मिळेल याकडे लक्ष द्यावे या उद्देशाने मी द्राक्षे व कांद्याची गुढी उभारून संदेश दिला आहे .

संजय साठे, शेतकरी नैताळे

# अब्दुल सत्तारांना रात्रीचे जास्त दिसते


## जितेंद्र आव्हाडांचा कृषीमंत्र्यांना उपरोधिक टोला

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आपण भाग्यवान आहोत की, रात्रीचे दिसणारा माणूस हा महाराष्ट्राचा कृषीमंत्री आहे. दिवसा नाही दिसले तरी चालेल, कारण रात्रच महत्त्वाची असते. हास्यास्पद आहे हे सगळे. अजून हे नेते शेतकऱ्यांच्या बांधावर गेले नाहीत. नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे झालेले नाहीत. शेतकऱ्यांना एक रुपयादेखील मिळालेला नाही. शेतकऱ्यांना कोणी विचारत नाहीये, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. जितेंद्र आव्हाड यांनी केली.

मागील आठवड्यापासून राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान झाले आहे. बहुतांश शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे. त्यामुळे शेतकरी सरकारकडे भरपाईची मागणी करत आहेत. तसेच मंत्र्यांनी नुकसानग्रस्त भागाची अद्याप पाहाणी केली नसल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. विशेषतः कृषीमंत्री अब्दुल सत्तारांवर विरोधकांकडून टीका सुरू आहे. अशातच आता कृषीमंत्र्यांनी नुकसानग्रस्त शेतीचे पाहाणी दौरे सुरू केले आहेत.

कृषीमंत्री अब्दुल सत्तार मंगळवारी ( २१ मार्च ) नाशिकच्या





निफाड तालुक्यात नुकसानग्रस्त भागाच्या पाहाणीसाठी जाणार होते. कृषीमंत्री येणार म्हणून शेतकऱ्यांनीदेखील गर्दी केली होती. परंतु दुपारी येणारे कृषीमंत्री रात्री पोहोचले. त्यानंतर त्यांनी कुंभारी गावात एका द्राक्ष बागेची पाहाणी केली. परंतु या पाहणी दौऱ्यानंतर सत्तार यांच्यावर टीका सुरू झाली आहे. कृषीमंत्र्यांच्या रात्रीच्या पाहणी दौऱ्यावरून आमदार जितेंद्र आव्हाड यांनी सत्तार यांच्यावर निशाणा साधला आहे. कृषीमंत्र्यांच्या रात्रीच्या पाहणी दौऱ्याबद्दल एका वृत्तवाहिनीच्या प्रतिनिधीने आमदार जितेंद्र आव्हाड यांना सवाल केल्यानंतर आव्हाड म्हणाले की, सत्तारांना रात्रीच दिसते हे तुम्हाला माहित नाही का ? त्यांना रात्रीचंच फार दिसते, असे म्हणत टोला लगावला.


# राम मंदिरासाठी सागवान पाठवणार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अयोध्या येथील राम मंदिरासाठी १८०० क्यूबिक मीटर सागवान लाकूड चंद्रपूर जिल्ह्यातून पाठविण्यात येणार आहे. २९ मार्च रोजी भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे. या शोभायात्रेत उत्तर प्रदेश सरकार मधील तीन कॅबिनेट मंत्री तथा अयोध्या राम मंदिरातील पुजारी सहभागी होणार असल्याची माहिती भाजप नेते तथा राज्याचे सांस्कृतिक व वन मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.

भारतीय जनता पार्टी महानगर व ग्रामीणच्या वतीने गुढीपाडव्याचे औचित्य साधून बुधवार २२ मार्च रोजी सकाळी गगांधी चौक येथे गुढीपूजन व १ कोटी रामनाम जाप लिखाण पुस्तिकेचे वितरणाची सुरुवात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांचे हस्ते करण्यात आली. याप्रसंगी ते बोलत होते. रामनाम जापाच्या या पुस्तिका अयोध्या येथील नवनिर्मित राम मंदिरासाठी लोकनेते मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून बल्लारपूर येथून पाठविण्यात येणाऱ्या काष्ठ( सागवान )पूजन प्रसंगी २९ मार्चला प्रभू श्री रामाला समर्पित केल्या जातील.








आधुनिक केसरी

त्यांच्यात असे ठरले की या रूममध्ये फक्त स्त्रियांनी थांबावे आणि आम्हा पुरुष मंडळींसाठी एक वेगळी शेजारील रूम घ्यावी. झाले, मग काय मी माझी बॅग उचलली आणि शेजारच्या खोलीत गेलो. मला वाटले की आता आपण निवांत. कोणी आपल्या आरामात व्यत्यय आणणार नाही. असा विचार करून थोडं पडावं असा विचार केला तोच खाली जेवणाची तयारी झाली असा निरोप आला. लागोपाठ दोन तीन जण हा निरोप देण्यासाठी तत्परतेने खोलीत येऊन गेले. आता फारशी भूक नसली तरी जेवणासाठी जाणे भागच होते. आता जेवण झाल्यावर मस्तपैकी आराम करू असा बेत मनाशी आखला आणि जेवणासाठी खाली गेलो.

भोजनासाठी विविध पदार्थांची रेलचेल होती. मात्र आपल्याला हवे ते आणि हवे तेवढेच घेऊन आणि हातात वाढलेले ताट घेऊन बसण्यासाठी खुर्चीचा शोध घेतला. अशा प्रसंगी ताटात वाढून घेणे आणि बसण्यासाठी सोयीस्कर जागा शोधणे ही कामे मला फार कठीण वाटतात. कारण हातात ताट घेऊन चालण्याची कसरत, त्यातून कोणाला आपला धक्का लागून ते सांडू नये याचीही काळजी घ्यावी लागते. एकदा अशाच एका प्रसंगी माझा लग्नासाठी आणलेला चांगला पोशाख अन्न अंगावर सांडल्याने खराब झाला आहे. ( अर्थात त्यात माझी चूक नव्हतीच. दुसराच येऊन मला धडकला होता. तर असो. काही लोकांना हे सगळे फार छान जमते. एवढया गर्दीत हातात ताट घेऊन उभ्या उभ्या सुद्धा ही मंडळी जेऊ शकतात. खरे तर अशी मंडळी प्रशंसेला पात्र आहेत. पण त्यांची बिचाऱ्यांची कोणी दखल घेत नाही. तर असो. सुदैवाने मला बसण्यापुरती एक रिकामी खुर्ची दिसली. एखादे वेळी अशी का होईना पण आपल्याला खुर्ची मिळाली याचा कोण आनंद मला त्यावेळी झाला ! आता विविध पाहुण्यांचे आगमन व्हायला सुरुवात झाली होती. काही नुकतेच येऊन जेवणात सामील झाले होते तर काही मंडळी आपापल्या बॅगा सावरत येत होती.



## आनंदी पहाट

## शिक्षण निवडताना केवळ सामाजिक प्रतिष्ठा महत्वाची

आधुनिक केसरी

प्रवेश मिळवून देण्याची पालकांची क्षमता आहे म्हणून मुलं इंजिनीयरींगला जातात. पुढे एक तर कमी- अधिक गुण मिळवून इंजिनीयरींग पदवीधर होतात किंवा चार वर्षाचा कोर्स कधी पाच वर्षात तर कधी सहा वर्षात कसाबसा पूर्ण करतात. पुढे कॉलेजच्या माध्यमातून प्लेसमेंट त्यांना आणि त्यांच्या पालकांना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे डिझाईन किंवा आयटी मध्ये मिळत नाही. अनेकांचं व्यक्तीमत्व किंवा संवाद कौशल्ये सेल्स इंजिनीयर म्हणून करिअर करण्यायोग्य नसतं.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

काहीजणांचं व्यक्तीमत्व किंवा संवादकौशल्ये परिणामकारक असूनसुद्धा त्यांना आय टी किंवा डिझाईनमध्येच करीयर करायचं म्हणून इंजिनीयरींग केलेलं असतं. तर काहीजण आय. टी. आय किंवा पदविका पूर्ण करून मिळेल त्या पगारावर नोकरी करतात. ह्या सर्वाच्या जोडीला रिसेशन आणि स्पर्धा या समस्या तर प्रत्येक क्षेत्रात असतातच. ह्या सर्व कारणांमुळे पालकांचा पैसा विनाकारण खर्च होतोच, शिवाय इंजिनीयरींग शिक्षणात अमूल्य वेळही खर्च झालेला असतो. काही जणांच्या पदरी निराशा आलेली असते. काही वेळा, केवळ दहावीत जास्त मार्क्स आहेत, त्यामुळे बारावीचं शिक्षण शास्त्र शाखेत प्रवेश घेऊन केलं जातं. अलीकडे इंजिनियरिंगच्या जागा रिकाम्या राहतात म्हणून अथवा डोनेशन भरुन प्रवेश मिळवता येतो म्हणूनही अनेकांचा कल ह्या अभ्यासक्रमाकडे असल्याचं दिसून येतं. अनेक पालकांमध्ये आपलं अपत्य इंजिनियरिंगला गेलं नाही तर समाजातली आपली प्रतिष्ठा कमी होईल असा गैरसमज असल्याचं दिसून येतं. मग आमच्या मुलांनी इंजिनियरींग करुन आय. टी इंजिनीयर होण्याची स्वप्न पहायचीच नाहीत का ? असा एक सर्व साधारण प्रश्न पालकांच्या मनात असणं स्वाभाविक आहे.



आधुनिक केसरी

**जेणे होय भंग | स्वधर्माचा ||**
असावे सावध | निंदका पासून ||
करावे पालन | स्वधर्माचे ||१||
द्वेश निंदा स्वार्थ | रूजु नये मनी ||
शुद्ध ठेव वाणी | अंतर्बाह्य ||२||
सदा सर्वकाळ | चिंतणी रमावे ||
एकांती करावे | आत्मगुज||३||
जगरहाटीशी | हात मिळवावा ||
परि न सोडावा | संतसंग ||४||
माझ्या मना नको | करू त्यांचा संग ||
जेणे होय भंग | स्वधर्माचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी


बालाय रक्षयित्वा वै
ददथो वाञ्छितं युवाम्।
जपति युवयोर्नाम
धन्यो हि भुवनत्रये॥3॥
तुम्ही दोघे माता पिता बालकाचे रक्षण करता. त्याला जे हैवे ते देता. जो तुमच्या दोघांचे नाम जपतो, तो तिन्ही लोकी धन्य होतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !


**माया सींचे दुख मिलै, सिंचत बबुर में कॉट । सेवे प्रभु अमृत मिलै, सद्गुरु भव दुख काट ।।४९।।(स्वर्वेद प्रथम मण्डल चतुर्थ *अध्याय) ०१/०४/४९ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :** इंद्रिय सुखोपभोगाने मनाला सुख मिळते पण जेव्हा याचा वियोग होतो किंवा या उपभोग्य वस्तूंच्या सुख-प्राप्तीत अडथळा येतो तेव्हा हृदय दुःखी-कष्टी होतं. म्हणून आत्मिक उत्थानाच्या इच्छूक विवेकी पुरूषांसाठी हे आवश्यक आहे की त्यांनी संसार-विषय-माया- संबंध सोडून एकमात्र प्रभूप्राप्ती च्या साधनेला लागावे. ज्याप्रमाणे बाभळीच्या झाडाला पाणी दिल्याने त्याला काटेच येणार आहेत तद्वतच इंद्रियजन्य सुखांचा उपभोग केल्याने परिणामतः आत्म्याला दुःखच मिळणार आहे. म्हणूनच परमेश्वराच्या सेवा-भक्तीने सद्गुरूंच्या द्वारे भवबंधनाचं दुःख सुटून अमृत परमानंदाची प्राप्ती होते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.**

## काव्य-चरितावली



पुष्प १९वे

आधुनिक केसरी

श्रीतुकामाईचे दर्शनी रूप ते
कधी फार नीटनेटके नसे
बाह्यरुपास बघूनी ,सामान्य जन
त्यास वेडा तुका "म्हणीतसे ।।
श्रद्धाहींन ,लबाड,स्वार्थी माणसे
नजरेस पडती तेव्हा तुकामाई
अशांना त्वरे हाकलुन देती, परी
सुज्ञ जनांशी मार्मिकसे बोलती ।।
सत्पुरुष उमरखेडी वास्तव्यासी
चिन्मयानंद "म्हणती आदरे त्यासी
हे एकदा येहळेगावासी आले
तुकामाईला नदीकाठी भेटले ।।
नजरानजर दोघांची झाली
अश्रूंची धार नयनी सुरू झाली
चिन्मयानंदानी डोईवर हात ठेवला
श्रीतुकाराम"तुकारामचैतन्य झाला ।।
म्हणे कवी अरुणदास , छान हा
गुरुकृपेचा योग आज वर्णिला...।।




अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

## प्रपंचातले आपलेपण भगवंताकडे वळवा

आधुनिक केसरी

प्रेम हे सर्वांना उपजतच येत असते. हा माझा मुलगा, ही माझी मुलगी यांच्यावर प्रेम कसे करावे हे कुणी शिकवावे लागत नाही. एकदा आपले मानले की प्रेम आपोआप निर्माण होते. पण हे प्रेमसुद्धा खरे बघितले तर स्वार्थी आहे. मुलगा ऐकत नाही, तो वाटेल तसे वागतो अशी आपण तक्रार करतो. त्याच्यावर जर आपले खरे प्रेम असेल तर आपण तशी तक्रार करणार नाही परंतु त्याच्यामागे 'हा माझे ऐकत नाही' हा अहंकार, स्वार्थ आहे. एक गृहस्थ मला भेटले, त्यांना मी विचारले, "झाले का मुलाचे लग्न ?" ते म्हणाले, "नाही, उद्या आहे." "मुलगा चांगला वागतो का ?" असे मी विचारल्यावर ते म्हणाले, "आत्ताच नाही सांगत, सहा महिन्यांनी सांगेन." स्वार्थाचे प्रेम इतके अशाश्वत आहे ! मला सांगा, अशा स्वार्थाच्या प्रेमापासून सुख कसे लाभेल ? प्रपंचात आपण केवळ कर्तव्यबुद्धीने वागावे; मग 'मुलगा माझे ऐकत नाही' हा प्रश्नच उद्भवणार नाही. खरोखर प्रपंच हा एखाद्या प्रयोगशाळेसारखा आहे. कॉलेजचे शिक्षण



पुरे करण्यासाठी काही महिने तिथे शिकावे लागते असे म्हणतात. त्या प्रयोगशाळेतून काही उत्पादन काढण्याचा उद्देश नसतो, फक्त मुलांना शिकविण्यासाठी त्याचा उपयोग होतो. तिथे सर्व काही शिकून घ्यायचे असते; ते किती उपयोगी पडेल, त्यापासून किती फायदा होईल याची अपेक्षा ठेवायची नसते. त्याप्रमाणे प्रपंच ही परमार्थाची प्रयोगशाळा समजावी. आजपर्यंतचा आपला अनुभव पाहिला तर आपण 'केले' असे थोडेच असते. म्हणून परिस्थितीबद्दल फारशी काळजी न करता आपण आपले कर्तव्य तेवढे योग्य रीतीने करावे, आपल्या वृत्तीवर परिणाम होऊ देऊ नये. प्रत्येक गोष्ट घडायला योग्य वेळ-काळ यायला लागतो. तेव्हा कर्तव्यबुद्धीने वागून काय ते करा आणि 'भगवंता, हा प्रपंच तुझ्या इच्छेने चालला आहे' असे म्हणा, म्हणजे आपोआप भगवंताचे प्रेम लागेल. प्रपंचातले जे आपलेपण आहे ते भगवंताकडे वळवा. घरातल्या मंडळींवर निःस्वार्थबुद्धीने प्रेम करायला शिका म्हणजे परमार्थ आपोआप साधेल आणि आपलेपणा भगवंताकडे वळविल्यामुळे भगवंतावर प्रेम जडेल; याकरिता काही वेगळे करणे नको. हा आपलेपणा निर्माण होण्यासाठी, भगवंतावाचून आपले नडते ही भावना झाली पाहिजे. याकरिता आपण त्याच्या अखंड सहवासात राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याच्या नामस्मरणानेच ही गोष्ट सहज शक्य आहे.

**आजचे बोधवचन आहे -**
**७४. वाचलेले विसरेल, पाहिलेले विसरेल, कृती केलेली विसरेल, पण अंतःकरणात घट्ट धरलेले नाम कधी विसरायचे नाही.**
**श्रीराम समर्थ**

आधुनिक केसरी

तीळ जाळिले तांदुळ । काम क्रोधे तैसे चि खळ ॥१॥
कां रे सिणलासी वाउगा । न भजतां पांडुरंगा ॥ध्रु.॥

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

गुरुवार, २३ मार्च २०२३

adhunikkesari.com Adhunik Kesari



१८१ दिवस

मुदत ठेवीवर मिळवा

11%

व्याजदर

* नियम व अटी लागू



राजस्थानी मल्टीस्टेट

कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ

बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स



चंदुलाल बियाणी

चेअरमन

कार्यरत शाखा :

**मुख्य कार्यालय व शाखा :** मोंढा मार्केट, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072178/88
**पंचशिल नगर शाखा :** विद्यानगर जलालपूर रोड, पंचशिल नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072809
**मुख्य शाखा विस्तारित कक्ष :** ऊर्जा प्लाझा, गणेशपार रोड, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072181
**पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-१ :** दिगंबर कॉम्प्लेक्स, नेहरू चौक (तळ), परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072180
**पंचशिल नगर शाखा विस्तारित कक्ष-२** उड्डान पुला जवळ, शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072805
**सिरसाळा शाखा :** बड़े निवास, जुने बस स्टैंड रोड, सिरसाळा, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072184
**अंबाजोगाई शाखा:** प्रशांत नगर, बस स्टॅण्डच्या मागे, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072183
**विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-१ :** मोहन कॉम्प्लेक्स, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072802
**विस्तारीत कक्ष अंबाजोगाई-२** घाटनांदुर, मेनरोड, अंबाजोगाई, ता. अंबाजोगाई, जि. बीड. 9130072808
**बीड शाखा :** जिजामाता चौक, मोंढा रोड, ता. जि. बीड. 9130072221
**सोनपेठ शाखा :** स्नेह सदन, विटा रोड, सोनपेठ, ता. सोनपेठ, जि. परभणी. 9130072186
**गंगाखेड शाखा :** डॉक्टर लेन, एच.डी.एफ.सी. बँकेसमोर, गंगाखेड, जि. परभणी. 9130072807
**विभागीय कार्यालय व महेश नगर शाखा :** अपना बजार २०४ २०६, आकाशवाणी जवळ, औरंगाबाद 9130072176 / 77
**राजा बजार शाखा :** बालाजी मंदिर समोर, राजा बजार, शहागंज, मोंढा, ता. जि. औरंगाबाद. 9130072022
**माळीवाडा विस्तारीत कक्ष :** नाशिक रोड, माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद. 9130072803

**अंबड शाखा:** जालना-बीड रोड, महावीर चौक, आंबड, जि. जालना. 9130072804
**जालना शाखा :** मेन बस स्टैंड रोड, जालना, ता. जि. जालना. 9130072806
**जालना विस्तारीत कक्ष-१ :** जांगडे कॉम्प्लेक्स, जालना-अंबड रोड, ता. जि. जालना. 9130072226
**नांदेड विस्तारीत कक्ष :** पहिला मजला, गुरूकृपा मार्केट, महावीर चौक, ता. जि. नांदेड. 9130003070
**उदगीर विस्तारीत कक्ष :** पहिला मजला, लासूणे कॉम्प्लेक्स, देगलूर रोड, उदगीर, जि. लातूर. 9130072190
**टोकवाडी विस्तारीत कक्ष:** परळी-बीड रोड, टोकवाडी, ता. परळी वैजनाथ, जि. बीड. 9130072224
**दिंद्रुड विस्तारीत कक्ष :** शेप कॉम्प्लेक्स, परळी-बीड रोड, दिंद्रुड, ता. माजलगाव, जि. बीड. 9130002070
**लातूर विस्तारीत कक्ष :** कव्हा रोड, शिवनेरी गेट जवळ, लातूर 9130002070
**औराद विस्तारीत कक्ष :** मेन रोड, कृष्णा ऑईल मिल समोर, औराद शहाजनी, ता. निलंगा, जि. लातूर. 9130003044
**बीड विस्तारीत कक्ष :** मोंढा मार्केट, संतोषी माता मंदिर समोर, बीड, ता.जि. बीड. 9130072221
**उमरगा शाखा :** शिवाजी महाविद्यालय जवळ, बालाजी नगर, मेन रोड, उमरगा, जि. उस्मानाबाद.
**परभणी शाखा:** कापसे भवन, कच्छी बजार, सरदार वल्लभभाई पटेल रोड, परभणी.
**अहमदनगर शाखा:** शॉप नं. ३ व ४ बेसमेंट, मोरया कॉर्नर, मोरया मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, अहमदनगर.
**केज शाखा :** वकीलवाडी, कानडी रोड, केज, ता. केज. जि. बीड.
**माजलगाव शाखा :** गाळा क्र.८, सिद्धेश्वर कॉम्प्लेक्स, गढी कॉर्नर, गढी रोड, माजलगाव, ता. माजलगाव, जि. बीड.

**नियोजित शाखा :** धर्माबाद, उमरखेड, नाशिक, पंढरपूर, रेणापूर, पुणे, अकोला

टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in

कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद . मो. 9130072176, 9130072177


# अनाथांच्या अंगणी 'माणुसकीची' गुढी !

## वसुंधरा प्रतिष्ठानचा उपक्रम; पाणी वाचविण्यासाठी केली जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** येथील वसुंधरा प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने लातुरातील एमआयडीसी भागातील मुलींच्या अनाथ आश्रमात गुढीपाडवा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याला 'माणुसकीची गुढी' असे नाव देऊन या अनाथ लेकरांसोबत हे मराठी नवीन वर्षाची सुरुवात करण्यात आली. हा उपक्रम राबविण्याचे हे यंदाचे सहावे वर्ष आहे. गुढीपाडवा आणि जल दिन एकत्रित आल्याने यावेळी 'पाणी वाचवा.... भविष्य वाचवा' असा संदेश देण्यात आला. वसुंधरा प्रतिष्ठान ही सामाजिक संस्था गेल्या आठ वर्षांपासून पर्यावरण आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करीत आहे. अनाथांसोबत दिवाळी, दसरा आणि मराठी नववर्ष अर्थात गुढीपाडवा सण साजरा केला जातो. गेल्या सहा वर्षांपासून एमआयडीसी येथील अनाथ मुलींसोबत गुढीपाडवा हा सण साजरा केला जातो. याला 'माणुसकीची गुढी' असे नाव देण्यात आले आहे. वसुंधरा प्रतिष्ठानचे सदस्य दरवर्षी आपल्याकडे येतात म्हणून या अनाथ मुली आतुरतेने वाट पाहत असतात. माणुसकी जिवंत राहावी आणि अनाथ लेकरांना आपलं कोणीतरी आहे हा विश्वास देण्यासाठी हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येतो. यंदाही मोठ्या उत्साहात हा सण साजरा करण्यात आला. यावेळी वसतिगृह अधीक्षक सागर मलवाडे, वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.योगेश शर्मा, सचिव रामेश्वर बावळे, कार्याध्यक्ष अमोलआप्पा स्वामी, सदस्य संजय माकुडे आदींची उपस्थिती होती. याच ठिकाणी दरवर्षी वसुंधरा प्रतिष्ठानकडून दिवाळी साजरी केली जाते.



**माणुसकी जिवंत ठेवण्यासाठी उपक्रम : प्रा .योगेश शर्मा :** मोबाईल आणि सोशल मीडियाच्या जमान्यात माणुसकी हरवत चालली आहे . माणुसकी जिवंत राहावी आणि अनाथ लेकरांनाही सणांचा आनंद लुटता यावा यासाठी वसुंधरा प्रतिष्ठानतर्फे दिवाळी आणि नवीन वर्ष अनाथांसोबत साजरे केले जातात . हा क्षण आम्हालाही आंनद देतो, अशी भावनिक प्रतिक्रिया वसुंधरा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा . योगेश शर्मा यांनी या अनुषंगाने बोलताना दिली .

**लातूरकरांनो विसरू नका 'ते' दिवस ; पाणी वाचविण्यासाठी जनजागृती**

22 मार्च हा दिवस जल दिवस म्हणून साजरा केला जातो . लातूर शहरात 2016 मध्ये भीषण दुष्काळ असल्या कारणाने अक्षरश : रेल्वेने पाणी आणून तहान भागवावी लागली . त्यामुळे लातूरकर जनतेनी 'ते' दिवस विसरू नये या संदर्भात वसुंधरा प्रतिष्ठानने फलकाच्या माध्यमातून पाणी वाचविण्याबाबत जनजागृती करण्यात आली . पाणी वाचवा . . . भविष्य वाचवा असा संदेश देणारे हे फलक लातूरकरांचे लक्ष वेधून घेत असून या माध्यमातून जनजागृती होते आहे .

# चुलीकडे जाता येईना; सिलेंडर परवडेना

आधुनिक केसरी न्यूज

**बि. डी. रामपूरकर**

**जिंतूर :** शहरी व ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण व्हावे त्यांचे आरोग्य चांगले राहावे स्वयंपाक करताना लाकडी सरपंन वापरल्यामुळे होणारे तीव्र दुष्परिणाम कमी करण्यासाठी सरकारही प्रयत्न करत असून यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने प्रधानमंत्री उज्वला योजना चा मोठ्या थाटामाटात शुभारंभ केला पण या योजनेअंतर्गत राज्यातील मोफत घरगुती एलपीजी गॅस जोडणी जरी घराघरात पोहोचली असली तरी मात्र योजना सुरू झाल्यापासून वाढत्या सिलेंडर दरामुळे नागरिकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. सिलेंडरचे दर दिवसेंदिवस वाढत चालले आहेत यामुळे ग्रामीण भागातील स्त्रियांना पर्यायी इंधनांचा मार्ग हाती घ्यावा लागत असल्याचे चित्र स्पष्ट दिसते याची सवय लागल्याने आता चुलीवर स्वयंपाक करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे तर दुसरीकडे गॅस वाढ झाल्याने गॅस ची किंमतही गगनास भिडलेली असल्यामुळे आज गॅस आकराशे तीस रुपये पर्यंत असून तो परवडण्यासाठी महिलांची मोठी अडचण झाली असून याबाबत नाराजी चा सुर दिसून येत आहे. त्याचबरोबर घरपोच डिलिव्हरी करणाऱ्या मुलांना 20 ते 30 रुपये वेगळे घेतल्याशिवाय गॅस मिळत नाही ही एक शोकांतिकाच आहे.



**प्रधानमंत्री उज्वला योजना नावापुरतीच ?**

पंतप्रधान उज्वला योजना ज्या महिलांना गॅस सिलेंडर मोफत मिळाले आहेत त्यांनाही आता नवीन गॅस भरून घ्यायला परिस्थितीमुळे परवडत नसल्याने त्यांच्याकडेही रिकामे सिलेंडर कडून असल्याचे दिसून येते . त्या महिलांनाही नवीन सिलेंडर भरून घेण्यास परवडत नसल्याचे अनेक महिलांनी सांगितले .

# संसारातून तरूण जाण्याचा मार्ग म्हणजे नामस्मरण

## संदिप महाराज सांगळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** गणेशवाडी बाभुळतेल येथे आखंड हरीनाम सप्ताह सुरु आहे. यावेळी संदिप महाराज सांगळे यांनी पडता जड भारी! दासी आठवावा हरी!! मग तो होऊ नेदी शीण! आड घाली सुदर्शन! ! नामाच्या चिंतने! बारा वाटा पळती विघ्ने! ! तुका म्हणे प्राण! करा देवाशीच अर्पण!! या आभंगावर निरुपण करताना संदिप महाराज सांगळे म्हणाले आत्मप्रौढी स्वतःचा मोठेपणा दुसऱ्या बाबत आकस समोरच्याला कमी लेखनाची हिन मनोवृत्ती गर्वाची भाषा अहंपणाचा महामेरू हि जीवनातील पतनाची कारणे सोबत असतील तर जीवन कदापि सुंदर होणार नाही. कारण तुकोबाराय म्हणतात प्रत्येक वेळी आपल्यावर संकटे येतील त्या त्या संकटातून बाहेर काढणारा मार्ग म्हणजे भगवंताचे नामस्मरण आहेत.



हरि याहो आता मंदिरी! दुसरे नाही येथे कोणी !! हदयात देव आहे पण माणूस इतका आळसी झाला आहे कि तो देवाचे दर्शन नामस्मरण नामसाधना नाम संकीर्तन करत नाही आपल्यावर कितीही मोठे संकट जरी आले तरी ते भगवंताचे नामस्मरणाने दूर झाल्याशिवाय राहणार नाही. आत्ता पर्यंत आभासी सुखालाच खरे सुख मानून बसलो आहोत पण आमच्या संतानी अहोरात्र प्रयत्न करून सुखाचा मार्ग म्हणजे भगवंताचे नामस्मरण आहे म्हणून सांगितले मार्ग दावूनी गेले आधी दयानिधी संत ते प्रभु रामचंद्राला केवळ दासीने कैकयी मातेला सांगितले. की रामाला वनवासाला पाठवावे आणि भरताला गादीवर बसवावे ..पण प्रभु रामचंद्राने वनवास स्वीकारला पण भरताने त्या हरिला विसरले नाहीत. आत्ता पर्यंत जे रामायण घडले ते दासाचे सांगण्यावरून म्हणून तुकोबाराय म्हणतात सुखरूप ऐसा दुजा कोणी! नाही माझ्या पांडूरंगा वाचोनी!! कितीही संकटे आले तरी. ते भगवंताचे नामस्मरण विठ्ठलाचे भजन कीर्तन करण्याचे विसरू नये म्हणून अभंगाच्या दुसऱ्या चरणात तुकोबाराय म्हणतात , मग तो होऊ नेदी शीण! आड घाली सुदर्शन! आपले सर्व मनोरथ पुर्ण करणारी वैकुंठवासिनी योगीराज योगेश्वरी सह विराजमान असलेल्या विठ्ठलाच्या भक्ती मध्ये तल्लीन होऊन जावे कारण हा देह नाशिवंत आहे शाश्वत सत्य काय आहे तर ते भगवंताचे नामस्मरण विठ्ठलाचे नामस्मरण नाम संकीर्तन नाम चिंतन नाम साधना घेऊन जीवन पावन करून घ्यावेत अभंगाचे तिसऱ्या चरणात तुकोबाराय म्हणतात , नामाच्या चिंतने! बारा वाटा पळती विघ्ने !! नामाचा शक्ती महिमा अगाध आहे या देहाचा भरवसा नाही.. यासाठी आत्ताच विचार करा सारासार विचार करा उठा उठी! नाम धरा कंठी विठोबाचे!! नाम घेऊन या नरदेहाचे सार्थक करून घ्यावे.. नाम घेता वाया गेला ऐसा कोणी देखीला नामस्मरणाने महापापी दूराचारी सुध्दा उध्दरून जातो.

यावेळी गणेश महाराज वाकलेकर, सर्वानंदगिजी महाराज, भाऊसाहेब महाराज, भानुदास महाराज, लहु महाराज, रुस्तुम खोसे, योगेश महाराज, आजिनाथ महाराज, महेश महाराज, मीनाताई सुर्यवंशी शुभम महाराज, गौरव महाराज. एन.डी. काका यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते शेवटी महाराजांचे हसप्ताह कमिटीच्या वतीने चांगदेव जाधव यांनी आभार मानले.

# उत्सुकता विश्वचषकाची

आधुनिक केसरी

भारतात एकदिवसीय विश्वचषक २०२३ चा थरार रंगणार असून क्रिकेटच्या या मोठ्या टूर्नामेंटच्या तारखांबाबत आणि मैदानांविषयीची माहिती एका अहवालातून समोर आली आहे. विश्वचषकाचे सामने कोणत्या मैदानावर खेळवण्यात येणार आहेत, याविषयी सविस्तर माहिती बीसीसीआयच्या हवाल्याकडून जाहीर करण्यात आली आहे. एकदिवसीय विश्वचषकाचे सामने कोणत्या तारखेला खेळवले जाणार आहेत, याबाबतही खुलासा करण्यात आला आहे. ईसपीएन क्रिकइन्फोच्या अहवालानुसार यंदा भारतात होणारा एकदिवसीय सामन्यांचा विश्वचषक ५ ऑक्टोबरपासून सुरु होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. भारतातील १२ शहरांमध्ये या विश्वषकाचे सामने खेळवण्यात येणार आहेत. विश्वचषकाच्या सामन्यांसाठी भारतातील १२ शहरांतील मैदानांची निवड करण्यात आली आहे. या १२ शहरांमध्ये बंगळुरु, चेन्नई, दिल्ली, धरमशाला, गुवाहाटी, हैद्राबाद, कोलकाता, लखनऊ, इंदौर, राजकोट आणि मुंबई यांचा समावेश आहे. या विश्वचषकात एकूण ४८ सामने खेळवण्यात येणार असून यामध्ये तीन नॉकआऊट सामन्यांचा समावेश आहे. या विश्वचषकाचा अंतिम सामना १९ नोव्हेंबरला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियममध्ये खेळवण्यात येणार असल्याचे अहवालातून समोर आले आहे. ४६ दिवस या विश्वचषकाच्या सामन्यांचा थरार रंगणार आहे. दहा वर्षांपासून एकही आयसीसी ट्रॉफी भारताने जिंकली नाही. त्यामुळे यंदाचा विश्वचषक जिंकण्यासाठी भारताचे खेळाडू कंबर कसत आहेत. २०११ मध्ये भारताने विश्वचषकाच्या विजेत्यापदावर शिक्कामोर्तब केला होता. त्यामुळे १० वर्षानंतर होणाऱ्या या एकदिवसीय विश्वचषकावर टीम इंडिया पुन्हा एकदा नाव कोरणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरु असून आज चेन्नईत अंतिम सामना खेळवला जात आहे. आगामी होणाऱ्या विश्वचषकाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी ऑस्ट्रेलिया विरुद्ध सुरु असणारी मालिका जिंकणे आवश्यक आहे. खेळाडूंचा आत्मविश्वास आणखी वाढण्यासाठी या मालिकेवर जेतेपदाचे शिक्कामोर्तब करणे महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, यंदाच्या विश्वचषकासाठी टीम इंडियाचे नेतृत्व रोहित शर्मा करणार असून हे विश्वचषक जिंकण्यासाठी सर्व खेळाडू शर्थीचे प्रयत्न करतील, असा आशावाद व्यक्त केला जात आहे. या विश्वचषकाआधी ७ जून ते ११ जून दरम्यान भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना होणार आहे.

# स्वातंत्र्यलढ्यातील थोर क्रांतिकारक !



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**लाहोर खटल्याचा निकाल लावण्यात येऊन शिवराम राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना अतिशय गुप्तता राखत फाशी देण्यात आली. दि.२३ मार्च १९३१च्या सायंकाळी राजगुरू, भगतसिंग व सुखदेव हसत हसत फाशीला सामोरे गेले. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यात सतलज नदीच्या काठी हुसेनीवाला येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या तिघांच्या बलिदानाचा २३ मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो.**

नोव्हेंबर १९२८मध्ये भगतसिंग आणि त्यांचे सहकारी शिवराम राजगुरू यांनी २१ वर्षीय ब्रिटिश पोलीस अधिकारी जॉन साँडर्सला लाहोर येथे गोळ्या घालून ठार मारले. जेम्स स्कॉट यांना ठार मारण्याचा हेतू असताना चुकून साँडर्स बळी पडला. पोलीस अधीक्षक जेम्स स्कॉट याने हिंदुस्थानातील लोकप्रिय राष्ट्रवादी नेते लाला लजपत राय यांच्यावर लाठी चार्जचा आदेश देऊन त्यांना जबर जखमी केले. त्यामुळे लाला लजपत राय दोन आठवड्यांनंतर मरण पावले. त्यांच्या मृत्यूचा बदला म्हणून भगतसिंगांनी स्कॉटला मारण्याचा बेत केला होता. त्याच्या या कटात चंद्रशेखर आझाद व शिवराम हरी राजगुरू सहभागी होते. त्यानंतर भगतसिंग व राजगुरू यांचा शोध घेत असल्याचे पाहून चंद्रशेखर आझाद यांनी चानन सिंघ नावाच्या भारतीय पोलिस अधिकाऱ्याला मारले.

भगतसिंग: हे एक भारतीय क्रांतिकारक होते. हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याविरुद्धच्या लढ्यात त्यांनी केलेल्या दोन हिंसात्मक कार्यांमुळे वयाच्या २३व्या वर्षी त्यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. भगतसिंगांचा जन्म दि.२८ सप्टेंबर १९०७ रोजी तत्कालीन पंजाब प्रांतातील ल्यालंपूर जिल्ह्यातील बंगा गावात झाला. त्याच्या आईचे नाव विद्यावती व वडिलांचे किशनसिंग होते. ज्यावेळेस त्याच्या वडिलांची व दोन काकांची तुरुंगातून सुटका झाली, त्याच सुमारास भगतसिंगांचा जन्म झाला. त्यांच्या कुटुंबातील बरेच सदस्य भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सामील झाले होते, तर काही महाराजा रणजितसिंगाच्या सैन्यात होते. काही कुटुंबीय सामाजिक कार्यांमध्ये सक्रिय होते. त्याचे वडील व काका हे करतारसिंग साराभाई व हर दयाल यांच्या गदर पार्टीचे सदस्य होते. दि.९ सप्टेंबर १९२५ रोजी भगतसिंगांच्या पुढाकाराने व आग्रहाने क्रांतिकारकांच्या गुप्त संघटनेचे नाव हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन असे ठेवण्यात आले. असोसिएशन हा भाग समाजप्रबोधन, माहितीपत्रके, साहित्य सामग्रीची जमवाजमव, भूमिगतांना आश्रय देणे यासाठी तर आर्मी हा भाग प्रत्यक्ष क्रांतिकार्यासाठी असे विभाजन केले गेले. हुतात्मा चंद्रशेखर आझाद हे मुख्य समन्वयक व सेनेचे मुख्य सेनापती तर भगतसिंग यांच्यावर संघटनेचे समन्वयक व दोहोंचे सदस्य व नियंत्रक अशी कामगिरी सोपविली गेली. या संघटनेचे स्वप्न व एकमेव ध्येय म्हणजे सशस्त्र क्रांतीद्वारे इंग्रज सरकार उलथून टाकून भारतीय संघराज्याची स्थापना केली. खून करून, दरोडे घालून वा चार इंग्रजांना ठार करून काही स्वातंत्र्य मिळणार नाही असा त्यांचा उपहास वा धिक्कार केला गेला, तरी प्रत्यक्ष त्यांचे कार्य हे साक्षात राजसत्ता उलथून टाकण्यासाठी केलेले एक योजनाबद्ध स्वातंत्र्यसमर होते. याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे अभियोगात सरकारने ठेवलेले आरोपपत्र होय. शिवराम हरी राजगुरू: शिवराम राजगुरू हे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात फाशी गेलेले क्रांतिकारक होते. ते हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मी या संघटनेच्या क्रांतिकार्यात सहभागी झाले होते. डॉक्टर हर्डीकर यांच्या सेवा दलामध्ये असतानाच त्यांचा संबंध हा हिंदुस्तान रिपब्लिकन पार्टी या क्रांतिकारी संघटनेशी आला. चंद्रशेखर आझाद, भगत सिंग आणि सुखदेव अशा क्रांतिकारकांच्या सहवासात आल्याने ते सशस्त्र उठाव करण्यास प्रेरित झाले. नॅशनल बँकेची लूट, क्रांतिकारक जोगेश चंद्रा चॅटर्जी यांची सुटका यांतही त्यांचा सहभाग होता. राजगुरूंचा जन्म पुण्याजवळ खेड येथे दि.२४ ऑगस्ट १९०८ रोजी एका मराठी देशस्थ ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांना रघुनाथ या नावानेही ओळखले जात असे. लहानपणी १४व्या वर्षी इंग्रजी विषयातील अपयशामुळे वडील भावाने आपल्या नवविवाहित वधूसमोर त्यांना इंग्रजी धडा वाचायची शिक्षा केली. हा अपमान राजगुरूंना सहन झाला



नाही. अंगावरच्या कपड्यांनिशी आईने तेल आणण्यासाठी दिलेले ९ पैसे व बहिणीने अंजिरांसाठी दिलेल्या २ पैशांसह त्यांनी आपले घर सोडले. शिक्षणासाठी ते आधी नाशिक आणि त्यानंतर थेट काशीलाच पोहचले. काशीतील त्यांचा बराचसा वेळ हा लोकमान्य टिळक ग्रंथालयत, महाराष्ट्र विद्या मंडळातील व्याख्याने- वादविवाद ऐकण्यात आणि भारतसेवा मंडळाच्या व्यायामशाळेत लाठी-काठी, दांडपट्टा यांच्या शिक्षणात जात होता. त्याकाळी कलकत्ता, पाटणा, कानपूर, लखनौ, झांशी, मीरत, दिल्ली, लाहोर ही गावे क्रांतिकारकांची माहेरघरे होती. काशी येथील पं.मदनमोहन मालवीयांचे हिंदू विद्यापीठ हेच साऱ्यांचे आश्रयस्थान व गुप्त केंद्र होते. राजगुरूंची भारताला खरी ओळख झाली ती साँडर्सच्या वधाच्या वेळी!

सुखदेव: सुखदेव हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सशस्त्र क्रांतिकारक होते. त्यांचे मूळ नाव सुखदेव रामलाल थापर होते. त्यांचा जन्म लुधियानातील चौरा बाजार येथे दि.१५ मे १९०७ रोजी झाला. या ठिकाणाला नऊ घर असेही संबोधतात. आईचे नाव शल्लीदेवी असे होते. त्यांनी पंजाबमध्ये क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली. किंग जॉर्जच्या विरोधात गुप्त मसलतीच्या योजनेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांना धमकावले. यामुळे ब्रिटिश सरकारविरुद्ध सुखदेव अशी स्थिती निर्माण झाली. सुखदेवांनी ल्यालपूर- पंजाब येथे सन १९२६पासून तरुणांना एकत्र जमविण्यास सुरुवात केली. त्यांनी 'हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन'च्या वाङ्मयाचा तरुणांत प्रचार केला. दिल्ली येथे सन १९२८मध्ये सर्व क्रांतिनेत्यांची गुप्त परिषद भरली. तीत हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन नावाची नवीन देशव्यापी संघटना उभारण्याचे ठरले. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग हे पंजाबतर्फे होते. यात शिव वर्मा, चंद्रशेखर आझाद आणि कुंदनलाल हे विद्यार्थीही होते. संघटनेच्या ठरलेल्या कार्यक्रमानुसार बाँबची कवचे बनविण्यासाठी सुखदेव लाहोरला गेले. नंतर तयार बाँबची चाचणी झांशी येथे घेतली. लाहोरच्या नॅशनल कॉलेजमधील अभ्यासिकेत सुखदेव यांनी हिंदुस्थानचा इतिहास, रशियन राज्यक्रांती या विषयांचा चिकित्सकपणे अभ्यास केला. जागतिक पातळीवरील क्रांतिकारक साहित्याचे विविध दृष्टिकोण त्यांनी अभ्यासले. कॉम्रेड रामचंद्र,भगतसिंग व भगवतीचरण व्होरा यांच्या मदतीने त्यांनी 'नौजवान भारत सभा' ही संघटना लाहोर येथे स्थापन केली. या संघटनेचे कार्यक्रम असे ठरविण्यात आले- १) स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे. २) तर्कसंगत वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करणे. ३) जातियतेविरुद्घ लढणे. ४) अस्पृश्यतेची प्रथा बंद करणे. या कार्यक्रमांत त्यांनी सक्रिय भाग घेतला. सन १९२९ साली लाहोर खटल्याबद्दल तुरुंगात असताना त्यांनी कैद्यांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीबद्दल उपोषण केले.

लाहोर खटल्याचा निकाल लावण्यात येऊन शिवराम राजगुरू यांच्यासह भगतसिंग व सुखदेव यांना अतिशय गुप्तता राखत फाशी देण्यात आली. दि.२३ मार्च १९३१च्या सायंकाळी राजगुरू, भगतसिंग व सुखदेव हसत हसत फाशीला सामोरे गेले. पंजाबमधील फिरोजपूर जिल्ह्यात सतलज नदीच्या काठी हुसेनीवाला येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या तिघांच्या बलिदानाचा २३ मार्च हा दिवस भारतात राष्ट्रीय शहीद दिन म्हणून पाळण्यात येतो.

# पाणी संपूर्ण सृष्टीसाठी अमृतच



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**आज जगात पाणी अत्यंत महत्वाचा घटक आहे.कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतीरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. अन्न, वस्त्र, निवारा याचे मुख्य स्त्रोत पाणी आहे.कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी, जिवजंतु हे पाण्याविना जगुच शकत नाही.पाण्याविना निसर्ग नाही, जीवसृष्टी नाही व मानवही नाही.म्हणजेच आज पाण्याचा एक एक थेंब सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.**

1992 ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळेस विश्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघाने प्रत्येक वर्षी 22 मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. यानंतर 1993 मध्ये 22 मार्चला संपूर्ण जगात विश्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृगता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते. आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे.कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे. आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर 70 टक्के पाणी व 30 टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर व बीकट असल्याचे दिसून येते.कारण 70 टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही. त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे जगातील वाढती लोकसंख्या यामुळे जगातील 50 टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नस्तनाबुत झाली आहे व होत आहे.त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे.यामुळे आज जगात पाण्याची अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी वाढत आहे.समुद्राची पातळी वाढने म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे.जगात वाढते तापमान, हवामानातील बदल,औद्योगिकीकरण, जंगलतोड, युद्धजन्य परिस्थिती,व अनेक परमाणु परिक्षण यामुळे निसर्गानचे संतुलन ढासळतांना दिसत आहे. औद्योगिकरणाच्या दुषीत वातावरणामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो. यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे. जगातील हिमकडे साबुत रहाले तरच पाण्याची समस्या आपोआप कमी होईल.परंतु मानव स्वतःच्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे. अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडे कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात 80 टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन मीळत असते.परंतु मानवाच्या अतीरेकामुळे हिमकडे वेळेच्या आधी वितळायला लागले आहेत. त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी तळागाळातुन प्रयत्न व्हायलाच पाहिजे. आज जंगलातील संपूर्ण हिंसक पशु शहरांकडे का येत आहे याचा विचार कोणीच करीत नाही. जंगलातील हिंसक पशु-पक्षी शहरात येत नसुन आपण त्यांच्या घरावर म्हणजेच जंगलावर अतिक्रमण व आक्रमक करीत आहोत.त्यामुळे जंगलातील पशु-पक्षी शहरात व गावात येतांना दिसतात.पुर्वी छोटे-छोटे तलाव असायचे.परंतु आज पुर्विचे छोटे-छोटे तलाव वस्ती व कारखाण्यामध्ये परीवर्तीत झालेले दिसुन येतात.त्यामुळे आज गावात, शहरात,वस्तीत संपूर्ण ठिकाणी पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अत्याचार होय.सध्याच्या काळात जगामध्ये आगजनीच्या घटना व वनवेलागने या मोठ्या प्रमाणात घटना दिसून येतात. पूर्वी नदी, ओढे, तलाव, झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी, तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली 50 ते 60 फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता 50 ते 60 फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते. हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय? आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन गेली आहे. अनेक देशात गृहयुद्ध सुरू आहे.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचवीण्याचा संकल्प करायला पाहिजे.अन्न,वस्त्र,निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.त्यामुळे भारतासह संपूर्ण जगाने 22 मार्चला विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजुन घेतले पाहिजे.जगापुढे शुद्ध पाण्याची गंभीर समस्या आहे. त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी भारतासह संपूर्ण जगाने युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे. पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित.पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे. भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल,सिंह,कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करताना दिसतात. यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# संघटनेतून संघर्ष करण्याची ताकद : डॉ. खेरडे

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** देशभरात वेगवेगळे संघटना उपलब्ध असून आपल्या न्याय व हक्कासाठी ते संघर्ष करीत असतात. त्यापैकीच विद्यापीठ आणि महाविद्यालय स्तरावरील ग्रंथपालांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी आपली मुक्ला ही संघटना कार्य करीत आहे. ग्रंथालय क्षेत्रातील वेगवेगळ्या समस्या सोडवण्यासाठी संघटना कटिबद्ध असून संघटनेतून संघर्ष करण्याची ताकद मिळते, असे प्रतिपादन संघटनेचे अध्यक्ष डॉ. मोहन खेरडे यांनी नाशिक येथे आयोजित सहाव्या राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये केले.
पुढे ते म्हणाले ग्रंथालय क्षेत्रातील कुठल्याही प्रश्न सोडवण्यासाठी मी व संघटना कटिबद्ध आहे असे त्यांनी या कार्यशाळेमध्ये सर्व उपस्थित ग्रंथपालांना तसेच ग्रंथालय क्षेत्रातील व्यक्तींना आश्वासित केले.



सदरील कार्यशाळा महाराष्ट्र विद्यापीठ व महाविद्यालय ग्रंथपाल संघटना आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेक्शनल कौन्शील, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने "National Education Policy 2020 and Libraries" या विषयावर तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या क्षेत्रातील नवनवीन मुद्द्यावर चर्चा व्हावी यासाठी संघटनेची राष्ट्रीय परिषद ही नाशिक येथे दि. १८ - १९ मार्च २०२३ रोजी श्री राष्ट्रसंत सदगुरू जनार्दन स्वामी आश्रम, नाशिक येथील सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती.
या कार्यशाळेमध्ये संघटनेतर्फे महाराष्ट्रामध्ये सर्व विद्यापीठामध्ये सिनेट सदस्या म्हणून निवडून आलेले ग्रंथपाल सदस्यांचा सत्कार करण्यात आला व ग्रंथालय शास्त्रातील एकूण दहा व्यक्ती वेगवेगळ्या विभागातून बिनविरोध निवडून गेलेले आहेत तसेच काहींची नियुक्ती करण्यात आली, अशा सर्वांचा सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला तसेच पुणे, नगर आणि नाशिक मधील सेवानिवृत्त ग्रंथपालांचा सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला याप्रसंगी एकूण वीस सेवानिवृत्त ग्रंथपाल उपस्थित होते.

# मालगाडीचे 'कपलिंग' तुटले; रेल्वेची वाहतूक विस्कळीत

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** कोळसा वाहून नेणाऱ्या रेल्वे मालगाडीचे 'कपलिंग' तुटल्याची घटना अकोल्यातील न्यू तापडिया नगर रेल्वे फाटकाजवळ बुधवारी दुपारी घडली. सुदैवाने मोठी दुर्घटना टळली असून या घटनेमुळे मध्य रेल्वेची वाहतूक काही काळासाठी विस्कळीत झाली होती. बडनेरावरून भुसावळकडे कोळसा वाहून नेणारी मालगाडी निघाली होती. ही मालगाडी अकोला शहरातील न्यू तापडिया नगर रेल्वे फाटकाजवळ आली असताना अचानक एका डब्याचे 'कपलिंग' तुटले. त्यामुळे इंजिनसह निम्मे डब्बे पुढे निघून गेले. मागे ३५ डब्बे सुटले होते. तात्काळ याची माहिती लोकोपायलटला देऊन गाडी थांबवण्यात आली. या घटनेची माहिती रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर धाव घेतली. पुढे गेलेली गाडी पुन्हा मागे आणून दुरुस्तीचे कार्य युद्ध पातळीवर करण्यात आले. 'कपलिंग' जोडून मालगाडी अकोला रेल्वे स्थानकाकडे रवाना झाली. दरम्यान, नागपूर-मुंबईदरम्यानची मध्य रेल्वेची वाहतूक काही काळ रोखून धरण्यात आली होती. त्यामुळे रेल्वे गाड्यांच्या वेळापत्रकावर परिणाम झाला. या घटनेमुळे रेल्वे फाटक बंद असल्याने न्यू तापडिया नगरकडे जाणारी वाहतूक देखील प्रभावित झाली.

# बसचा भीषण अपघात; दोन प्रवासी ठार

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** दारव्हा येथून नागपूरकडे जाणाऱ्या बसचा कामठवाडा येथे भीषण अपघात झाला. या अपघातात दोन प्रवासी ठार तर १० पेक्षा अधिक प्रवासी गंभीर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दुपारी १.१५ वाजताच्या सुमारास हा अपघात झाला. दारव्हा-नागपूर (एमएच ४० वाय ५०२२) ही बस नागपूरकडे जात असताना कामठवाडा येथे समोरून येणाऱ्या मालवाहु वाहनाचे नियंत्रण सुटल्याने बसचा एका बाजूचा भाग चिरत गेला. हे मालवाहू वाहन पाईप घेऊन जात होते. या अपघातात दोन प्रवासी जागीच ठार झाल्याची माहिती आहे. अपघात घडताच गावकऱ्यांसह मागाहून आलेल्या एसटीतील प्रवाशांनी मदतकार्य सुरू करून जखमींना बसच्या बाहेर काढले. अपघातात १० पेक्षा अधिक प्रवासी गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्यात आले. अपघातातील मृत व जखमी प्रवाशांची नावे अद्याप कळली नाहीत. लाडखेड पोलिसांसह एसटीचे अधिकारी घटनास्थळी पोहचले.

# गल्ले बोरगाव परिसरात नुकसानीची पाहणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गल्ले बोरगाव परिसरात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे शेतमाल आडवे पडल्याने मोठे नुकसान झाले असून, मंगळवारी उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार सुरेंद्र देशमुख, तालुका कृषी अधिकारीशिरीष घनबहादुर यांनी पाहणी केली. दरम्यान नुकसान झालेल्या पिकाचे पाहणी करून पंचनामे करण्याचे सूचना उपविभागीय अधिकारी यांनी दिल्या. दिनांक १७, १८, १९ दरम्यान परिसरात झालेल्या अवकाळी पावसाने गहू, ज्वारी आडवी पडली तर उन्हाळी मक्का, बाजरी, कांदा पिकाचे नुकसान झाले होते, या बाबत शेतकरी वर्गाकडून तत्काळ पण पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत होती, त्या अनुषंगाने मंगळवारी उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते, तहसीलदार सुरेंद्र देशमुख,



तालुका कृषी अधिकारीशिरीष घनबहादुर यांनी पाहणी केली. या वेळी कृषीमंडळअधिकारी वैशाली पवार, सरपंच विशाल खोसरे, उपसरपंच रामदास चंद्रटिके, पोलीस पाटील बढे पाटील, खरेदी विक्री संघ संचालक बाबासाहेब चंद्रटिके, शेतकरी संघटना तालुकाध्यक्ष राजू हारदे, कृषी उत्पन्न बाजार समिती माजी उपसभापती संतोष राजपूत, माजी व्हॉईस चेअरमन दिलीप राजपुत, विविध कार्यकारी सेवा संस्था सदस्य ज्ञानेश्वर भगत, कृषी सहायक संजय ढबाले, गोकर्णा गिरम, माजी ग्रामपंचायत सदस्य देविदास भागवत, लक्ष्मणराव हारदे, संतोष ठेंगडे, ज्ञानेश्वर खोसरे, उमेश जैस्वाल, तुषार खोसरे, रमेश राजपुत, लक्ष्मण अमृते, गणेश खोसरे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# जिल्हा बँकेचे जाचक वसुली थांबवणे संदर्भात कृषी मंत्र्यांना साकडे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून जाचक वसुली सुरू आहे. मात्र अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर ही जाचक वसुली थांबवावी यासाठी राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्याकडे शेतकऱ्यांच्या वतीने साकडे घालण्यात आले. नाशिक जिल्ह्यात बऱ्याच भागात गेल्या आठ दिवसापासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळे द्राक्ष, कांदा, गहू या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. पिक उभे करण्यासाठी केलेला खर्च देखील पदरात पडणे मुश्किल आहे. अशा परिस्थितीत ना.जि.म.स. बँक ही शेतकऱ्यांकडून जुलमी व सक्तीची वसुली करत आहे. शेतकऱ्यांच्या ७/१२ वर बँकेचे नाव दाखल करून १००/८५ च्या अपसेट प्राईजच्या नोटीसा अतिशय घाई घाईने देण्यात येऊन, शेतकऱ्यांचे नावे ही वृत्तपत्रात प्रकाशित करत मानहानी करून जमिनीचे लिलाव करीत आहे. तरी सदर प्रकार त्वरीत थांबवण्याचे आदेश जिल्हा बँकेला द्यावे व राष्ट्रीयकृत बँकेप्रमाणे एकरकमी कर्जफेड योजना लागू करून व्याज माफ करावे ही विनंती करण्यात आली. नागपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये देखील साडेसहा हजार शेतकऱ्यांच्या जमिनीची लिलाव प्रक्रिया सुरू केली होती. सदर प्रश्न मा.आमदार अनिल देशमुख यांनी विधानसभेमध्ये उपस्थित केला होता त्या प्रश्नास उत्तर देताना मा.उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना असे अपमानित करता येणार नाही त्यांनी



तात्काळ बँकेना आदेश देण्यात येतील अशी घोषणा विधानसभेमध्ये केली व जमिनीचे लिलाव प्रक्रिया ताबडतोब थांबविण्यात येईल असे आश्वासन दिले. त्याच धर्तीवर नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या जमिनीची लिलाव प्रक्रिया थांबवण्याचे आदेश हे ना.जि.म.स.बँकेस संबंधीतांनी देऊन नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा ही विनंती कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांना शेतकरी बांधवांनी केली. कृषीमंत्र्यांनी मुंबई येथे गेल्यावर तात्काळ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सहकार मंत्री यांना वरील माहिती देवून तात्काळ शेतकरी वर्गाला दिलासा देण्यात येईल असे आश्वासन शेतकरी बांधवांना दिले. सदर निवेदन देताना शिवसेना तालुकाप्रमुख प्रकाश पाटील, बाळासाहेब होळकर, रविराज बोराडे, केशवराव जाधव, संदीप पवार, दत्तात्रेय मुद्गुल, साईनाथ मुद्गुल, दत्तात्रय सुडके, भगवान बोराडे, शिवा ढोमसे यांसह लासलगावमधील अनेक युवा शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र Business Katta












# सरकारचे निर्णय आणि जनतेचा विरोध

## || मंथनाचे पैलू ||





डॉ. धोंडोपंत मानवतकर
संपर्क क्र. 9890827414

लेखांक : १०

काल परभणीच्या बसस्टॉपवर छत्रपती संभाजीनगर गाडीची वाट पाहत उभा होतो... बसस्टॉपवर भयंकर गर्दी पाहून थक्क झालो... वाटले आता आपल्याला गाडीत जागा भेटणेच काय गाडीत चढणेसुद्धा अत्यंत कठीण आहे. गर्दीच तशी होती. गाड्या गच्च भरून जाताहेत तरी गर्दी जेवढ्याला तेवढीच..!

गाडी आली की, जागा धरण्यासाठी पळापळ सुरु होत होती...गाडी आली की,गाडीच्या दरवाजा जवळ भयंकर गर्दी... कंडक्टरला सुद्धा उतरायला लोक संधी देत नव्हते...यात म्हाताऱ्या माणसांची गाडीत चढण्यासाठी ससेहोलपट होत होती..अंगावर काटा येत होता. बसस्टॉपवर ज्येष्ठांची संख्या तशी अधिकच दिसत होती. एसटी महामंडळाने नुकताच स्त्रीयांसाठीही अर्ध्या तिकीटात प्रवास सुरू केला आहे.. म्हणून बसस्टँडवर गर्दी वाढलेली होती. ज्या गावी जावे त्या बसस्टॉपवर गर्दीच गर्दी.

या अगोदर महाराष्ट्र सरकारने ७५ वर्षावरील ज्येष्ठांसाठी विनामूल्य प्रवास सुरू केला. ६५ वर्षावरील नागरिकांना तर अर्धे तिकीट होतेच... या अर्ध्या तिकीटाचा लाभ काही खऱ्या, काही खोट्या लोकांनी घेतला. आमच्या लहानपणी तिकीटच काढायचे नाही म्हणून आईवडील लहान मुलांचे वय लपवण्याचा प्रताप करत होते. "त्याला अजून शाळेतच टाकलं नाही म्हणायचे." आता तर खरं वय लपवण्याचा प्रताप ज्येष्ठमंडळीसुद्धा करत आहेत आणि एसटी महामंडळाचा लाभ घेत आहेत. सरकारला जनता फसवते की, जनतेला सरकार फसवतंय काही कळंना झालंय. एकीकडे गॅससारख्या अनेक गोष्टी महाग करून प्रवास स्वस्त केलाय की काय ? असा विचार येतो... सुरुवातीला पंतप्रधानांच्या नावावरची उज्ज्वला गॅस योजना आली. सिलेंडर शंभर रुपयाला देऊन कुटुंबातील स्त्रीवर्गाला खूष केले. नंतर वाढत, वाढवत गॅस नेऊन घातला अकराशे रुपयावर...
आता खेड्यातील बायकांनी पुन्हा एकदा सरपणावर स्वयंपाक करणे सुरू केले आहे. स्वयंपाकाच्या सरपणासाठी खेड्यातील मायमावल्यांची पुन्हा भटकंती सुरु झाली आहे... गरीब कुटुंबातसुद्धा कमीतकमी पाच सहा लोक असतात. एवढ्या लोकांना हा गॅस फक्त पंधरावीस दिवसच पुरतो. बिचारा गरीब नवरा दर पंधरा दिवसाला अकराशे रुपये कुठून आणणार.. ?
केंद्रसरकार तर गरीबांना सिलेंडर शंभर रुपयात देऊन जनतेवर उपकार करून बसलंय...आणि आता गॅस अकराशे रुपयावर गेल्याने नवरेही त्रस्त आणि बायकाही त्रस्त आहेत.. एस.टी.च्या भाड्यात पन्नास टक्के कपात केल्याने स्त्रीवर्ग खूष होईल या अपेक्षेने सरकारने हे पाऊल उचलले आहे; परंतु या सवलतीवर अनेक स्त्रिया बोलत आहेत. व्हिडिओ करून टाकत आहेत.. म्हणताहेत,"महिलांना पन्नास टक्के सवलत एस.टी.बसमध्ये नको, गॅस सिलेंडर मध्ये द्या.! योजना फिरण्यासाठी नाही तर जगण्यासाठी पाहिजेत." महिला तर आता चक्क सरकारलाच ज्ञानाचे डोस पाजताहेत... म्हणजे ज्या गोष्टी 'सरकारच्या लक्षात येत नाहीत त्या जनतेच्या लक्षात येतात आणि हे सरकारला प्रत्यक्ष सांगता येत नाही म्हणून लोक प्रसारमाध्यमांद्वारे बोलू लागले आहेत.

बसस्टॉपवर एक तासभर प्रवाशांचे चलिंतर पाहत उभा होतो. व्हॉटसअॅपला एक ज्योक आला होता, तो सांगतो.. **एस.टी प्रवास..!**
७५ वर्षाच्या पुढील लोकांना फुकट प्रवास.
६५ वर्षाच्या पुढील लोकांना हाफ तिकीट.
५ वर्षाखालील मुलांना फुकट प्रवास.
५ वर्ष ते १२ वर्ष मुलांना हाफ तिकीट.
आता महिलांनाही सरसकट हाफ तिकीट.
कंडक्टर आणि ड्रायवर फुकट.
मग आम्हीच कोणाच्या कोंबड्या चोरल्या जे आम्ही पूर्ण पैसे द्यायचे ?
इति पुरुष मंडळी - हाच तो विनोद.

जनता खूप हुशार झाली आहे. आता जनतेच्या हुशारीचासुद्धा राज्यकर्ते अंदाज लावू शकत नाहीत. दुसरा एक व्हॉटसअॅप वर आलेला विनोद तो असा...
महिलांना एस. टी.मध्ये 50% सवलत दिल्याने त्या आता सारख्या सारख्या माहेरी जाणार.!
त्या माहेरी गेल्या की माणसे बाटली आणि चखणा घेऊन बसणार... अश्या प्रकारे सरकारचा महसुल वाढणार...म्हणून महिलांना अर्धे तिकीट केले.
सरकारचा खुलासा...! लोकांच्या सुपीक डोक्यातून काय विचार बाहेर पडतील सांगता येत नाही.
ह्या विनोदात चक्क एसटी चे चित्र व सासर ते माहेर असा बोर्ड दाखवला आहे. लोक विनोदातूनसुद्धा सरकारच्या विरोधात बरंच काही बोलतात. सरकारने या सामाजिक प्रसारमाध्यमांवरसुद्धा लक्ष ठेवून जनतेचा विरोध समजून घेतला पाहिजे.

अलिकडे महाराष्ट्र शासनही अनेक तडकाफडकी निर्णय घेऊन ते जनतेवर लादत आहे. केंद्रातल्या सत्तेने जनतेचा बोलण्याचा अधिकारही हिरावून घेतला आहे. महाराष्ट्रातील शासनही केंद्रातल्या सत्तेच्या इशाऱ्यावर चालू आहे. अगोदर एका पक्षाचे दोन तुकडे करून सत्ता निर्माण केली आणि ती काहीही करून टिकली पाहिजे म्हणून सत्ता टिकवून ठेवण्यासाठी काहीही निर्णय घेतले जातात. मग ते जनतेला पटोत अथवा न पटो, परंतु ते लादले जाताहेत. लोक बेरोजगारीवर, महागाईवर बोलू नयेत म्हणून लोकांची मने विचलीत करण्यात येत आहेत. अलिकडे राज्यसरकार घेत असलेले निर्णयही तसेच आहेत... मात्र ते चुकीचे आहेत की,चांगले हे जनता ठरवत आहे. सोशल मिडियावर व्यक्त होत आहे.

हुकुमशाहीच्या काळात "राजा बोले दल हले" अशी एक म्हण प्रचलीत होती. आज ती शासन, प्रशासनाच्या काळातही लागू पडते आहे.

'सरकार बोले दल हले.' केंद्र सरकारने नोटबंदीसह अनेक निर्णय घेतले. ती नोटबंदी नव्हती, नोट बदली होती. या नोट बदलीच्या काळात जनता बँकेच्या दारात दिवसभर उभी राहिली. श्रीमंत मंडळी मात्र बँकेच्या दारात उभी राहिलेली दिसली नाही. त्या श्रीमंत मंडळीने वेगवेगळ्या प्रकारे घरबसल्या ब्लॅक पैसा व्हाईट करून घेतला आणि गरीब माणूस प्रामाणिकपणा दाखवून कंगाल होऊन बसला.त्या नोटबंदीचे परिणाम तो आजही भोगतो आहे.

गरीबांचा संसार नोटबंदी, कोरोना, महागाई, रोजगार, अशा अनेक समस्याने खिळखिळा करून टाकला आहे. तो गरीब आजही या सर्व समस्यांसोबत झुंज देतो आहे. त्याची झुंज अजून सुरूच आहे. अनेक समस्याने इथला गरीब माणूस अत्यंत त्रस्त आहे. सध्या ऑनलाईन व्यवहाराने खेड्यातील माणूस त्रस्त आहे.. तो अजूनही या आभासी चलनाचे तोटेच भोगतो आहे...




खेड्यात एकतर वीज नसते म्हणजे त्याला वीजेवर चालणाऱ्या उपकरणाचा फायदा घेता येत नाही, तरीही अव्वाच्या सव्वा आलेले वीजबिल भरावेच लागते.

खेड्यात मोबाईलचे टॉवर नसते..म्हणून रेंज नसते... म्हणून ऑनलाईन पेमेंट देण्या-घेण्याची समस्या वाढलेली असते..खेड्यातील मजुरांना वेळेवर पैसे मिळत नाहीत. ऑनलाईन पेमेंट करतांना तो सांगतो, "मोबाईलमध्ये चिक्कार पैसे आहेत हो; पण रेंज नसल्यामुळे ते पाठवता येईनात"... या ऑनलाईन समस्येमुळे अनेकांना खोटं बोलायलाही वाव मिळतोय. अजून काही वर्षे ह्या समस्या माणसांना त्रास देतील, फसवत राहतील. काही वर्षे खोटे बोलणाऱ्यांचेही धकून जाईल...आणि सरकार नव्याने वेगवेगळ्या समस्या निर्माण करत राहील. जनतेला सरकारच्या काही चुकीच्या निर्णयाचे भोग भोगावे लागत आहेत.

केंद्रातील सत्ताधाऱ्यांनी भारतातील जनतेवर त्यांची अनेक धोरणे लादली आहेत. लादत आहेत. जनता जसजसे सहन करेल तसतसे अनेक कायदे जनतेवर लादत आहेत; मात्र जनतेचा उद्रेक सत्ताधारी लोकांना अजून माहित नाही.. आता ती रस्त्यावर उतरत आहे. प्रसारमाध्यमांद्वारे निडरपणे बोलत आहे. जनतेच्या उद्रेकाला सुरुवात झाली आहे, राज्यकर्त्यांनी जनतेचा संयम पाहू नये.

महाराष्ट्र सरकार असो की, केंद्र सरकार फक्त खोट्या जाहिराती करत आहेत. सरकार जुन्याच योजनांना नवे नाव देऊन जाहिराती करत आहे. जणू या सगळ्या योजना चालू सरकारच्याच असे भासवले जात आहे. जनतेच्या हिताचे, जनतेला रुचेल असे निर्णय घेऊन सरकार चालवावे, नाहीतर.. नदीला महापूर येऊन जशी मोठमोठी झाडे, मोठमोठ्या दरडी कोसळतात, कधी गावेच्या गावे जलमय करून नदी नुकसान करते... तद्वतच जनतेचा उद्रेक असतो ती अशाप्रकारे सत्ताधाऱ्यांचे नुकसान करू शकते हे पंचवार्षिक सत्ताधाऱ्यांनी लक्षात ठेवावे.

**( माझ्या काही आयाबहिणींची मने दुखावली जाण्याची शक्यता आहे त्याबद्दल क्षमस्व..!)**

**लेखक हे सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक आहेत.**

# मित्रहो, खाऊन भांडा, उपाशीपोटी नव्हे !



कॉ. के.के. जांबकर
मो. 9422870578

आधुनिक केसरी

**होळीच्या तसेच रंगपंचमीच्या सर्वांना हार्दिक, हार्दिक शुभेच्छा होळी हा सण हिंदू धर्मातील प्रमुख सण आहे आणि सर्वाचा आवडता सण आहे. संपूर्ण भारत देशभर मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गेल्या दोन वर्षाच्या कोरोना काळात होळीचा सण साजरा करताना कोणीही दिसून आले नाही. कोरोना नावाचा महाभयंकर संकट एकवेळचा निघून गेला आणि तो पुन्हा कधीच येऊ नये असे सर्वांना वाटत असते कारण त्याने सर्वाच्या जीवनातील रंग तर घेऊनच गेला पण हसत्या, खेळत्या कुटुंबाला कायमचा रडवत ठेवून निघून गेला ही महा भयंकर परिस्थिती आपण सर्वजण जवळून बघितले आहे.**

मी भांडण या शब्दाचा उल्लेख करत नाही तर संघर्ष हा शब्द या लेखात मुद्दामच वापरत आहे. भांडण हे क्षणिक असू शकते पण संघर्ष नव्हे. भांडणाचे स्वरूप हे वैयक्तिक किंवा सामूहिक ही होऊ शकते पण संघर्ष ही अविरतपणे चालणारी प्रक्रिया आहे. माझ्या विचारांती दोन्ही शब्दांचे स्वरूप वेग वेगळे आहे.
संघर्ष हा एक सामाजिक प्रक्रियेचा भाग असून त्याचे स्वरूप परिस्थितीनुरूप सार्वजनिक असू शकते. जर प्रश्न हे सामाजिक स्वरूपाचे असतील तर त्याचा हक्क प्राप्ती साठी संघर्ष हा एकमेव पर्याय असतो. त्या साठी कायम संघर्षशील राहून त्या त्या समूहाला कायम न्याय मिळेपर्यंत लढावेच लागते. त्या साठी तत्वनिष्ठ तडजोड, सामंजस्य व परदर्शीपणा असणे अत्यंत गरजेचे आहे, अन्यथा नुसता संघर्ष करून हाताला काही लागत नाही उलटपक्षी व्यक्ती अथवा समाज आर्थिक, शारीरिक, व मानसिक दृष्ट्या हताश होऊन नैराश्याप्रति पोहोंचतो. संघर्षाप्रति हताश होऊन चालत नाही तर त्याला कायम सय्यमाने व बुद्धीचातुर्याने सामोरे जाऊन प्रश्नांची सोडवणूक करावी लागते. ही वृत्ती ज्या व्यक्ती अथवा समूहात असते तेच आपले प्रश्न सोडविण्याप्रति यशस्वी होतात. याचा अर्थ माघार अथवा कमीपणा समजण्याचे कारण नसावे. यालाच दुसऱ्या शब्दात बुद्धीचातुर्य अथवा कौशल्य म्हणता येईल. एक सरळ सोपे उदाहरण म्हणजे एखाद्या स्पर्धकाला जर लांब उडीत प्रथम यायचे असेल तर तो जसा थोडेसे लांबून धावत येऊन लांब उडी घेऊन प्रथम येतो, अगदी त्याच प्रमाणे धेय्यधोरणे अवलंबून संघर्ष केल्यास यश निश्चितच मिळते. हा माझा वैयक्तिक अनुभव असून अशाच नितीतत्वाने मी जीवन व सार्वजनिक क्षेत्रात संघर्ष करत असतो व थोड्या अंतराने का होईना पण नेहेमीच यशस्वी होतो. अनेक उदाहरणे देऊन असे यशस्वीपण मी आपणास समर्थपणे पटवून देऊ शकतो. कुठल्याही व्यक्तिगत अथवा सार्वजनिक संघर्ष प्रक्रियेत अडेलतट्टू अथवा टोकाची भूमिका घेऊन यश प्राप्ती होत नसते.
मागील आठ दिवसांपासून राज्यभरातील शिक्षक तथा सरकारी कर्मचारी आपल्या विविध मागण्यांसाठी संपावर आहेत. त्यांच्या सर्वच मागण्या रास्त असून त्या बाबत माझी कायम सकारात्मक भूमिका आहे. आमच्या विविध कामगार, कर्मचारी, कष्टकरी वर्गाच्या हितार्थ मी नेहेमीच रस्त्यावर उतरून संघर्षशील असतो त्यामुळे काही ना काही पदरात पाडून घेतल्याशिवाय शांत बसत नाही. पुन्हा पुन्हा नव्या उमेदीने तयार होऊन लढण्यासाठी सज्ज असतो. सेवक हा सेवकच असतो, तो सत्ताधारी नसतो मग तो राजकीय पुढारी असो वा जनतेतील कुठलाही सेवार्थी घटक. सेवेकरी हा जनता व ज्या त्या संस्थेतील दुवा असल्यामुळे त्याला आम जनतेला निकोप सेवा देणे बंधनकारक आहे व सेवेचा मोबदलाही मिळणे हक्कस्वरूप आहे.
सेवा या सशुल्क किंवा निशुल्क असू शकतात, सशुल्क सेवेत अर्थार्जन दडलेले असल्यामुळे त्याचे सेवाशुल्क प्रमाण वेगवेगळे असते. काम स्वरूप ज्या त्या सेवेचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे पण भांडवलदार धार्जिणी शासनकर्ती जमात सेवेकरी व कष्टकरी वर्गाला कायदा व नियमानुसार मोबदला देत नसल्यामुळे तमाम कष्टकरी वर्ग कायम आर्थिक विवंचनेत असतो. अशा परिस्थितीत आपल्या हक्कप्राप्तीसाठी त्याला वेगवेगळ्या प्रकारे आंदोलने अथवा संघर्ष करून आपल्या हक्कासाठी न्याय मिळवून घ्यावा लागतो. एक छोटे वास्तव उदाहरण मी आपल्यासमोर ठेवतो. मागील कैक वर्षांपासून आम्ही आयटक च्या माध्यमातून विविध शासकीय, निमशासकीय व खाजगी क्षेत्रातील कामगार,



कर्मचारी व कष्टकरी वर्गाच्या न्याय हक्कासाठी लढत आहोत. महाराष्ट्र शासनाने ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना शासन निर्णयानुसार सन २००७ पासून राहणीमान भत्ता लागू केला पण त्याची अंमलबजावणी झाली नसल्यामुळे त्याच्या प्राप्तीसाठी जिल्हापरिषद व पंचायत समितीकडे वेळोवेळी पाठपुरावा करून नांदेड पंचायत समिती अंतर्गत काही कर्मचाऱ्यांना तो मागील थकबाकीसह मिळवून दिला, राज्यात इतरत्र ठिकाणी अजूनही तो देय्य आहे. बिडी कामगारांच्या विविध मागण्याबाबत वारंवार संघर्ष करून हक्क मिळविले. हे सर्व करत असतांना संघटनेने व्यवस्थापनाशी नेहेमीच सामंजस्य व तडजोडीनेच वागून यश मिळविले. तडजोडीचा अर्थ आर्थिक / दामोजीपंतांची तडजोड नव्हे बरं. यातील महत्वाचा मुद्दा म्हणजे आपण सेवेकरी असल्यामुळे व्यवस्थापन जगले तर कामगार जगेल त्याला खूप काळ वेठीस धरून नव्हे. सेवेकरी वृत्तीला आपले हक्क मिळवून घेण्यासाठी दोन्ही बाजूने सामंजस्य व बुद्धीचातुर्याचा विचार करावा लागतो, व्यवस्थापन तोडून नव्हे. थोडक्यात व्यवस्थापन जिवंत राहिले तर कामगार व कारखाना जिवंत राहील अन्यथा आपले हक्क आपण कसे मिळवून घेणार ? दोघेही राहिले पाहिजेत यालाच तडजोड अथवा सामंजस्य म्हणता येईल. वर्तमानात स्वार्थी नेतृत्व वृत्तीमुळे दोन्ही बाजूने अशी स्थिती दिसत नाही. पूर्वी आंदोलक उपाशीपोटी राहून क्रांती करत आज तशी स्थिती नाही.
आज प्रत्येकजण वैयक्तिक स्वार्थसागरात बुडाले आहेत. कुणालाही देश अथवा समाज हिताचे काही देणेघेणे उरले नाही. वर्तमानात राज्यकर्ते तथा जनप्रतिनिधी सर्वसामान्यांपेक्षा जास्तीचे स्वार्थी आणि भ्रष्ट असून नेहेमीच समाज हिताचे ढोंग करून सत्ताप्राप्त करत असतात. भविष्यात सर्व कामगार, कर्मचारी व कष्टकरी वर्गाला आपले कीमान हित साध्य करावयाचे असेल तर कष्टकरी वर्गाला सत्तेत सहभागी होऊन आपले हित साध्य करून घ्यावे लागेल अन्यथा नेहेमीच आपणास त्यांच्याकडे भिकेची झोळी पुढे करावी लागेल. वर्तमानातील संपकऱ्यांची स्थिती पाहता आपणही जेवढे जास्तीचे मिळते तेवढे आधी पदरात घेऊन उर्वरित घेण्यासाठी परत संघर्षाला सिध्ध राहावे लागेल म्हणून मला असे वाटते
**"खाऊन भांडा, संघर्ष करा, उपाशीपोटी नव्हे"**
**"हर कोशीश मे शायद सफलता ना मिले,**
**लेकीन हर सफलता का कारण कोशीश ही होती है।"**
**जयहिंद ।इन्कलाब जिंदाबाद ।लाल सलाम**

# भारताची शस्त्रास्त्र क्षेत्रात आत्मनिर्भरतेकडे वाटचाल



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**गेल्या चार ते पाच वर्षात भारताने शस्त्रास्त्राबाबत आत्मनिर्भर बनण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. आज भारताने स्वतःची शस्त्रे आणि संरक्षण उपकरणे इतर देशांना विकण्यात आघाडी घेतली आहे. देशात शस्त्रास्त्रे आणि क्षेपणास्त्रे तयार करण्याचे कामही वेगाने सुरु झाले आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्राशिवाय आकाश हवाई संरक्षण यंत्रणा आणि स्वदेशी जेट विमान तेजसनेही जगभरात धुमाकूळ घातला आहे. तेजस खरेदीसाठी बड्या देशांनी स्वारस्य दाखवले आहे.संरक्षण साधनसामग्रीचा सर्वात मोठा आयातदार अमेरिकादेखील भारतातील या पूर्णपणे विकसित लढाऊ विमानाबाबत रस दाखवत आहे. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, इंडोनेशिया आणि फिलीपिन्ससह सहा देश तेजस खरेदीसाठी पुढे आले आहेत.**

मलेशियाने आधीच हे विमान खरेदी करण्याची ऑफर दिली आहे. या अंतर्गत तो भारताकडून अठरा तेजस खरेदी करण्यास इच्छुक आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड द्वारा निर्मित, तेजस हे एकल-इंजिन बहु-भूमिका लढाऊ विमान आहे ज्यात उच्च-जोखीम असलेल्या वातावरणात काम करण्याची क्षमता आहे.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर अनेक क्षेत्रात मोठे काम झाले, पण संरक्षण क्षेत्र एकप्रकारे दुर्लक्षितच राहिले होते. याचाच परिणाम असा झाला की अनेक दशके भारत संरक्षण वस्तू आणि शस्त्रास्त्रांसाठी इतर देशांवर अवलंबून राहिला. याची सुरुवातीपासूनच काळजी घेतली असती तर 1962 मध्ये चीनबरोबरचे युद्ध आपण हरलो नसतो. तेव्हा लडाखसारख्या थंड प्रदेशात लढण्यासाठी योग्य लष्करी पोशाख आणि बूटही आमच्या सैनिकांकडे नव्हते.मात्र त्यानंतरही बराच काळ भारत संरक्षण उपकरणे आणि छोट्या जीवनावश्यक वस्तूंसाठी इतर देशांकडे आशाळभूतपणे पाहत राहिला. काही वर्षांपूर्वीही भारताच्या संरक्षण क्षेत्रात वापरण्यात येणारी बहुतेक उत्पादने, शस्त्रे आणि उपकरणे परदेशातून आणली जात होती. यामुळेच भारत संपूर्ण जगात संरक्षण उपकरणांचा सर्वात मोठा आयातदार राहिला.पण आता परिस्थिती बदलत आहे. आज आग्नेय आशियात भारताचा दबदबा वाढत आहे. शस्त्रास्त्रांच्या निर्यातीमुळे देशाचे उत्पन्न तर वाढलेच, पण फिलिपाइन्सनंतर व्हिएतनाम, इंडोनेशिया या देशांनीही भारताकडून शस्त्र खरेदी करण्यात रस दाखवला आहे. चीन दक्षिण चीन समुद्रापासून आग्नेय आशियापर्यंत विस्तारवादी धोरण अवलंबत आहे. त्यामुळे आग्नेय आशियाई देशांसाठी ते मोठे आव्हान बनले आहे.

साहजिकच अशा परिस्थितीत लष्करी ताकद वाढवणे ही प्रत्येक देशाची काळाची गरज बनत आहे आणि योगायोगाने भारताला ही संधी मिळत आहे. ब्रह्मोस क्षेपणास्त्राव्यतिरिक्त, भारतात विकसित हवाई संरक्षण प्रणाली देखील जगाच्या संरक्षण बाजारपेठेत खूप लोकप्रिय आहे. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसारखे देशही या शस्त्रास्त्र प्रणाली आमच्याकडून विकत घेऊ पाहत आहेत. सध्या अंदाजे बेचाळीस देश भारताकडून संरक्षण उपकरणे आणि शस्त्रे आयात करतात. या देशांमध्ये कतार, लेबनॉन, इराक, इक्वेडोर आणि जपान या देशांचाही समावेश आहे.भारतातून निर्यात होणारी संरक्षण उपकरणे आणि शस्त्रास्त्र प्रणालींमध्ये प्रामुख्याने लढाऊ परिस्थितीत शरीर संरक्षण उपकरणे समाविष्ट असतात. व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि फिलिपाइन्स व्यतिरिक्त बहारीन, केनिया, सौदी अरेबिया, इजिप्त, अल्जेरिया आणि संयुक्त अरब अमिराती या देशांनीही आकाश क्षेपणास्त्र खरेदीसाठी रस दाखवला आहे. इतर अनेक देश किनारी पाळत यंत्रणा, रडार आणि हवाई प्लॅटफॉर्म विकत घेण्याचा विचार करत आहेत. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि दक्षिण आफ्रिका भारताकडून ब्रह्मोस क्षेपणास्त्रे खरेदी करण्यासाठी चर्चा करत आहेत. ध्वनीच्या तिप्पट वेग असलेले ब्रह्मोस क्षेपणास्त्र हे भारत-रशिया लष्करी सहकार्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. 1998 मध्ये दोन्ही देशांमध्ये त्याच्या निर्माणावर सहमती झाली होती. ब्रह्मपुत्रा आणि मॉस्क्वा नद्यांच्या नावावरून ब्रह्मोस क्षेपणास्त्राचे नाव देण्यात आले आहे.

संरक्षण उपकरणांच्या निर्यातीच्या बाबतीत भारत आज जगातील पहिल्या पंचवीस देशांच्या यादीत सामील झाला आहे. 2019 मध्ये संरक्षण उपकरणांच्या निर्यातीत भारत एकोणिसाव्या क्रमांकावर होता. नव्वदच्या दशकात, जिथे भारताला शस्त्रास्त्रे शोधून काढणारी रडार यंत्रणा मिळवण्यासाठी अमेरिका आणि इस्रायलकडे हात



पसरायला भाग पडले होते, त्याच रडार यंत्रणा आर्मेनियाला विकून भारताने अलीकडे संरक्षण बाजारपेठेत आपला झेंडा उंचावला आहे. भारताची चालू आर्थिक वर्ष 2022-23 मध्ये शस्त्रास्त्रे आणि संरक्षण तंत्रज्ञानाची निर्यात 13 हजार 399 कोटी रुपयांवर पोहोचली आहे, अशी माहिती सरकारने संसदेत नुकतीच दिली. 2017-18 पासून ते 2022-23 पर्यंतचा हा सर्वोच्च आकडा आहे.

कनिष्ठ संरक्षण मंत्री अजय भट्ट यांनी राज्यसभेत लेखी उत्तरात गेल्या पाच वर्षांतील संरक्षण निर्यातीच्या मूल्याबद्दल तपशीलवार माहिती दिली. त्यांनी सांगितले की 2017-18 मध्ये 4682 कोटी रुपये, 2018-19 मध्ये 10,746 कोटी रुपये, 2019-20 मध्ये 9116 कोटी रुपये होते. 2020-21 मध्ये 8435 कोटी रुपये आणि 2021-22 मध्ये 12815 कोटी रुपये. 14 मार्च रोजी 2022-23 चा आकडा 13399 कोटी रुपये होता. नौदलाची जहाजे संपूर्णपणे भारतातच बांधण्यातही मोठे यश आले आहे. भारतातील संरक्षण उपकरणे बनवणाऱ्या कंपन्यांनी स्वस्त गस्ती नौका बनवून इतर देशांना विकल्या आहेत. त्याचप्रमाणे, हवाई संरक्षण क्षेत्रात, हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने प्रायोगिक तत्त्वावर उच्च स्तरीय कमी वजनाच्या हेलिकॉप्टरची यशस्वी निर्मिती केली आहे. आता सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील अनेक संरक्षण उपकरणे उत्पादक कंपन्या नवीन उत्पादनांसह जगातील इतर देशांशी स्पर्धा करण्याच्या स्थितीत येत आहेत.

2022-23 या आर्थिक वर्षाच्या संरक्षण अर्थसंकल्पात शोध आणि संशोधनावर खर्च करायच्या एकूण रकमेच्या पंचवीस टक्के रक्कम खाजगी उद्योग आणि नाविन्यपूर्ण उद्योगांना उपलब्ध करून दिली जाईल, अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, संरक्षण सेवांच्या आधुनिकीकरणासाठी 12 टक्के वाढीसह 1.52 लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.महत्त्वाचे म्हणजे सरकारने 2024-25 पर्यंत संरक्षण निर्यातीचे 36 हजार 500 कोटी रुपयांचे लक्ष्य गाठण्याचे लक्ष्य ठेवले आहे. सध्या सरकारचा भर स्वदेशी शस्त्रास्त्र निर्मितीवर जास्त आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केंद्राने आयुध निर्माणी मंडळ (आर्डिनेंस फैक्ट्री बोर्ड) आणि 41 आयुध निर्माण कारखान्यांचे विलीनीकरण करून संरक्षण क्षेत्रात सात सार्वजनिक उपक्रम (डीपीएसयू) तयार केले आहेत.

याचा उद्देश म्हणजे प्रशासकीय चपळाईने काम करताना पारदर्शकता आणि गती आणणे हा आहे. गेल्या आठ वर्षांत भारताची संरक्षण निर्यात जवळपास सहा पटीने वाढली आहे. फिलिपाइन्ससोबतचा 2 हजार 770 कोटी रुपयांचा संरक्षण करार हा मैलाचा दगड ठरला आहे. गेल्या चार-पाच वर्षांत देशाच्या संरक्षण आयातीत सुमारे एकवीस टक्क्यांनी घट झाली आहे. दुसरीकडे संरक्षण निर्यात सात पटीने वाढली आहे. भारत जसा जागतिक पटलावर स्वतःला प्रस्थापित करत आहे, तशीच आव्हानेही आहेत. राष्ट्रीय संरक्षण आता सीमापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते अधिक व्यापक आहे. त्यामुळे या नव्या आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. भारताच्या हिताला हानी पोहोचवू इच्छिणाऱ्या शक्तींचे प्रयत्न आपण हाणून पाडले पाहिजेत. आणि हे तेव्हाच होऊ शकते जेव्हा आपण संरक्षण आणि सुरक्षेच्या बाबतीत आत्मनिर्भर असू. संरक्षण संबंधित आवश्यक वस्तू आपल्या इथे बनवल्यास आणि जर आपण शस्त्रास्त्रे, संरक्षण यंत्रणा आणि लष्करी उपकरणांच्या बाबतीत पूर्णपणे स्वयंपूर्ण झालो तर जगातील कोणताही देश आपल्याला दबावाखाली घेऊ शकणार नाही.

# कर्मचाऱ्यांनी बेताल वक्तव्य टाळावे



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**हा लेख सर्वच कर्मचाऱ्यांना नव्हे तर सोशल मीडिया व इतर माध्यमातून बेरोजगार युवक व सर्वसामान्य जनतेला दुय्यम हिन बेअक्कल आणि बुद्धी नसलेले समजतात त्याच कर्मचाऱ्यांसाठी आहे. अनेक कर्मचारी काम करत असताना सुद्धा समाज घटकांना मदत करतात त्या कर्मचाऱ्यांना वंदन. सध्या राज्यामध्ये जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी सरकारी कर्मचारी आंदोलन करत होते व सरकारी कर्मचाऱ्यांना पेन्शनची गरज नाही, त्या पेन्शनमध्ये नवीन रोजगार निर्माण व्हावा म्हणून बेरोजगार तरून किंवा सर्वसामान्य जनता पेन्शनला विरोध करत आहे. बेरोजगार आणि सर्वसामान्य जनता अशी पेन्शनला विरोध करत नाहीये कर्मचाऱ्यांनी नोकरीवर लागल्यानंतर जी समाजामध्ये प्रतिमा तयार केली त्या प्रतिमेला लोकांचा विरोध आहे.**

ही बाब अजूनही कर्मचारी समजून घ्यायला तयार नाहीत. सर्वसामान्य जनता व बेरोजगार तरुण पेन्शन का नको हे बोलत आहेत, त्याच्या मागचे कारण आहे. लोकांचे कामे वेळेवर न करणे लाच घेणे, भ्रष्टाचार करणे, व महिन्याला नियमानुसार पगार घेणे. सर्व कामे अनियमित करून नियमाने पगार व वेगवेगळे माध्यमातून येणारा पैसा जमवल्या जातो. म्हणून या गोष्टीला त्यांचा विरोध आहे. आंदोलनाच्या माध्यमातून अजूनही कर्मचाऱ्यांनी आम्ही लाच घेत नाही, किंवा कामे वेळेवर करतो, यावर भाष्य केलेले नाही. कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळावे हा त्यांचा संविधानिक अधिकार आहे याबद्दल कुठेही दुमत नाही. परंतु त्यांनी इतरांची लायकी अक्कल बुद्धी तपासू नये. सरकारी कर्मचारी व्यवस्थेचा भाग आहेत व या व्यवस्थेने सर्व सामान्य लोकांना त्रस्त करून सोडलेले आहे. आणि व्यवस्थेचा भाग असताना कर्मचारी स्वतःसाठी आंदोलन करतात परंतु जनतेच्या हितासाठी एकही शब्द बोलत नाहीत म्हणून सुद्धा सर्वसामान्य लोक या आंदोलनाला विरोध करत आहेत, ही साधी गोष्ट ही कर्मचारी समजून न घेता सर्वसामान्य जनता व बेरोजगार तरुण यांना खालच्या पातळीवर जाऊन विरोध करत आहेत. कर्मचाऱ्यांनी केलेला विरोध हा वैचारिक असायला पाहिजेत परंतु हे बेरोजगार युवकांपेक्षाही खालच्या पातळीवर जाऊन आणि त्यांच्या भावना लक्षात न घेता त्यांना विरोध करताना दिसत आहेत. आणि विरोध करताना अक्कल नाही बुद्धी नाही आणि तुमची नोकरीवर लागण्याची लायकी नाही अशा खालच्या पातळीवर जाऊन टीका केली तर, समोरच्याची लायकी अक्कल आणि बुद्धी हे दिसते की नाही हे माहिती नाही परंतु बोलणाऱ्यांचे शिक्षण व संस्कार स्पष्ट दिसतात. म्हणून दुसऱ्याची अक्कल लायकी व बुद्धी तपासणी अगोदर आपण आत्मपरीक्षण जर केले तर योग्य होईल. नोकरी मिळाली म्हणजे इतरांना तुच्छ समजणे कर्मचारी वर्गाने सोडून द्यावे. कारण याच एटीट्यूड मुळे कर्मचाऱ्यांचा सन्मान कमी झालेला. आहे ही वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही. सत्य बोलले तर राग येणे साहजिक आहे आपण बुद्धी लायकी व अक्कल याचा विचार केला तर अक्कलबुद्धी आणि लायकी यावर त्यांनी बोलावं ज्यांना 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी या मधला फरक कळत नाही, आणि दोन्ही दिवस सारखेच साजरे करतात. बुद्धी आणि अक्कलेवर त्यांनी बोलावं ज्यांना देशाच्या राष्ट्रध्वजाला काय म्हणतात हे माहिती नाही. अक्कल आणि बुद्धीवर त्यांनी बोलावं जे ब्रिटिशांनी दीडशे वर्ष राज्य केले हे मान्य करतात. अक्कल व बुद्धी यावर त्यांनी बोलावं ज्यांनी कोरोना सारख्या फेक महामारीला महामारी समजून औषधी नसतानाही लाखो रुपयांची बिल सर्वसामान्य लोकांकडून वसूल करताना गप्प होते. अक्कल व बुद्धीवर त्यांनी बोलावं यांनी लसीकरणाच्या माध्यमातून अनेक आजारांना निमंत्रण दिले. यावर त्यांनी बोलावं ज्यांना जुनी पेन्शन योजना व नवीन पेन्शन योजना या मधला फरक माहिती नाही. बुद्धी व अक्कल यावर त्यांनी बोलावं ज्यांनी गुणवत्तेवर आधारित पगार आंदोलनाला विरोध केला. एक स्पर्धा परीक्षा पास होऊन नोकरी मिळवली त्यातही अनेक पदांसाठी लाखो रुपये भरून नोकरी मिळवली असेल हेही नाकारता येत नाही. परंतु नोकरी लागली म्हणून स्वतःला एवढा बुद्धिमान समजू नये, की लोकांची बुद्धी तपासायला लागू. काही काही महाशय तर आम्ही रात्रंदिवस अभ्यास करून लागलो तुम्हीही अभ्यास करा आणि लागून दाखवा असे बोलत आहेत. काही लोकांनी तर नवीन भरतीचा आकडा सुद्धा जाहीर केला सात-आठ हजार जागा निघालेले आहेत परीक्षा पास व्हा आणि लागून दाखवा असे त्यांनी बोलुन दाखवले आहे. मुळात सरकार दरवर्षी किती जागा काढते बेरोजगारांची संख्या किती याचं गणित व माहिती कदाचित कर्मचाऱ्यांना नसेल. सध्या महाराष्ट्राचा तरी विचार केला तरीही एक करोड पेक्षा जास्त बेरोजगार मिळतील एक करोड बेरोजगारांनी सात-आठ हजार जागेवर नोकरी करायची ? सात आठ हजार लोक नोकरीलाही लागले उर्वरित बेरोजगार तरुणांचं काय? हा मूळ मुद्दा आहे आणि हाच मुद्दा कर्मचाऱ्यांच्या लक्षात येत नाही.

डिपार्टमेंट मध्ये जागा खाली असताना वेळप्रसंगी काही कर्मचारी कंत्राटी पद्धतीने भरताना हे कर्मचारी विरोध करत नाहीत, आणि बेरोजगार तरुणांनी एका मोर्चाद्वारे सांगितले आम्ही अर्ध्या पगारावर काम करायला तयार आहोत या मागची भूमिका कर्मचाऱ्यांनी समजून घेणे गरजेचे आहे कर्मचाऱ्यांना पगाराच्या माध्यमातून पैसा येऊन त्यांचे कुटुंब आनंदी आहे परंतु अनेक सुशिक्षित तरुण यांच्या घरी संध्याकाळची चूल पेटेल की नाही याची भ्रांत आहे तरीही त्यांनी व्यक्त होऊ नये? आणि त्यांनी व्यक्त झाल्याच्या नंतर त्यांचे आपण अक्कल काढावी? सरकारी कर्मचारी आज बोलत आहेत बेरोजगार तरुणांनी आज अर्ध्या पगारावर जर काम केले तर उद्या त्यांना खाजगीकरणात लाथ मारून कामावरून काढून टाकतील. सरकारी कर्मचाऱ्यांना खाजगीकरण कधीपासून लागू झाले याची तरी जाणीव आहे का? आणि आज ते खाजगीकरणावर बोलत आहेत स्वतःची मुले खाजगी शाळेत टाकून सरकारी नोकरीवर जात होते तेव्हा खाजगीकरण नव्हते का? स्वतःच्या कुटुंबातील लोकांना खाजगी हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करून सरकारी नोकरीमध्ये जात होते तेव्हा खाजगीकरण नव्हते का? तेव्हा का गप्प होते ? हाच मुद्दा सर्वसामान्य जनता खूप बेरोजगार तरुणांचा आहे. आणि त्यात आपण अक्कल काढता हे आपल्याला शोभणारे आहे का? अगोदरच जनता त्रस्त आहे आणि त्यातही कर्मचारी संपावर असल्याने सर्वसामान्य लोकांचे हाल होतात हे आलं थांबवण्यासाठी जर बेरोजगार तरुण अर्ध्या पगारावर काम करायला तयार आहोत असे म्हटले हे असते पण त्यामध्ये वावग काय? सर्व सामान्य नागरिकांचे प्रश्न जर योग्य वेळी योग्य प्रकारे मार्गी लागले तर कर्मचाऱ्यांच्या विरोधात कोणीही जाणार नाही याची जाणीव कर्मचाऱ्यांना असणे गरजेचे आहे. सरकारी कर्मचारी हे व्यवस्थेचा भाग असतात आणि ते जनतेला जबाबदार असतात जनतेची जी आरोप होत आहेत. त्या आरोपावर मात्र एकही शब्द कर्मचारी का बोलत नसतील. कामांमध्ये



वेळेमध्ये सुधारणा करू , आम्ही लाच घेणार नाही, डिपार्टमेंट मधील कोणी लाच घेणार नाही, जर घेतली तर आम्ही त्यांना विरोध करून जनतेची कामे पारदर्शक व प्रामाणिक करू. हे मात्र कर्मचारी बोलायला तयार नाही स्वतःला सुशिक्षित आणि बुद्धिवान समजणाऱ्या कर्मचाऱ्यांमुळेच कोरोणासारखी फेक माहामारी व त्यातून समाजाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. लसीकरणाच्या माध्यमातून जनतेला आजाराच्या खाईत ढकलले आहे. कॅन्सर, हार्ट अटॅक, डिप्रेशन सारखे आजार वाढून येणाऱ्या काळामध्ये एच आय व्ही, नपुंसकता येणार आहे. याची जाणीव स्वतःला विद्वान समजणाऱ्या लोकांना कधी येईल. स्वतःच्या बुद्धीचा अकलेचा व लायकीचा वापर हा समाजातील गरजु होतकरु व दुर्बल घटकांसाठी करावा लागतो. परंतु शासकीय कर्मचारी कोणत्या पद्धतीने काम करतात हे नव्याने सांगण्याची गरज नाही. शासकीय कर्मचाऱ्यांनी फक्त एवढेच बोलावे आलो तर जागेसाठी व रिक्त जागा कंत्राटी पद्धतीने न भरण्यासाठी तसेच जनतेचे कामे प्रामाणिक पारदर्शक व लाच न घेतात भ्रष्टाचार न करता व इतरांना करू देता करू तर बेरोजगार व सर्वसामान्य लोक आजही पाठिंबा द्यायला तयार आहेत. पण काय स्वतःला प्रामाणिक बुद्धिमान लायक समजणारे लोक जनभावना व स्वतःच्या डिपारमेंट मधील चुकीच्या गोष्टीवर बोलू सत्य स्वीकारतील जोपर्यंत फक्त स्वीकारले जाणार नाही तोपर्यंत व्यवस्थेवरती वार होणारच आहेत आणि आणि कर्मचारी हे व्यवस्थेचा भाग आहेत हे त्यांनी विसरू नये कर्मचाऱ्यांनी आपल्या बेताल वक्तव्य करून आपले संस्कार आपले शिक्षण हे वेगळ्या पद्धतीने बेरोजगार असेल कुणी जास्त शिकलेला ही नसेल याचा अर्थ त्याला अक्कल नाही त्याला बुद्धी नाही असा होत नाही कोणाला नाही हे जर बघायचं असेल तर कर्मचाऱ्यांनी मित्र तर बघण्याची गरज नाही त्यांनी शासकीय यंत्रणेकडेच बघावी आणि ठरवावे तुझ्या शाळेवर शिक्षक शिकवायला जातात त्याच शाळेमध्ये शिक्षकांचा मुलगा नसतो याचे कारण काय शिक्षकांना स्वतःच्या बुद्धिमत्तेवरती विश्वास नाही तुझ्या हॉस्पिटलमध्ये कर्मचारी वर्ग काम करतात त्या हॉस्पिटलमध्ये यांच्या परिवारातील सदस्य जात नाहीत का शासकीय यंत्रणेवर शासकीय बुद्धिमत्ता विश्वास नाही इतरांची बुद्धी लायकी व अक्कल काढणे याचा कोणालाही अधिकार नाही आणि आज कर्मचारी वर्ग सर्वसामान्य लोक व बेरोजगार तरुण यांची लायकी अकारबुद्धी तपासत आहेत त्यावर ती टीका टिपणी करत आहेत. जर याच तरुणांनी कर्मचाऱ्यांवर या पद्धतीचे वक्तव्य केले आणि चाचणी घ्यायचे ठरवले तर किती लोक यशस्वी होतील हा संशोधनाचा विषय आहे. असो तरीही कर्मचारी हे जनतेला जबाबदार असतात त्यांनी जबाबदारीने वागावं बेताल वक्तव्य टाळावेत. व तरुणांना बेरोजगार ठेवणारे आणि कर्मचाऱ्यांची पेन्शन ना करणारे हे सरकार आहे आणि सरकार विरोधात एकजुटीने आवाज कसा उठवायचा याची नियोजन करणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांनी समाजातील घटकांना हीन समजून त्यांच्यापासून दुरावा केला नसता, तर आज शासकीय कर्मचाऱ्यांना रस्त्यावर येण्याची वेळ झाली नसती ही लढाई सर्वसामान्य जनतेनेच लढली असती.

# खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण



अंकुश शिंगाडे, नागपूर
संपर्क क्र.: ९३७३३५९४५०

आधुनिक केसरी

**खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण! होय. खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण. कारण ज्यावेळेस खाजगीकरण होईल. त्यावेळेस माणसाच्या योग्यतेचा विचार केला जाणार नाही. जे ओळखीचे आहेत. जे मालकाजवळ चुगल्या सांगतील. जे मालकासोबत चोपडे वागतील. त्यांनाच त्या काळात भाव येईल. आज देशात खाजगीकरण होवू घातलेले आहे. जी विद्यूत आपण वापरतो. ती विद्यूत आज खाजगी झालेली असून ते विद्यूत क्षेत्र कंपन्या चालवीत आहेत. त्यातच आता रेल्वेचंही खाजगीकरण झालं. ज्याप्रमाणे रेल्वे व विद्यूतचं खाजगीकरण झालं. तसाच प्रकार पोलीस, सैनिक व शिक्षण क्षेत्रात आलं आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षणसेवक हा प्रकार आलेला असून त्याला सरकार केव्हा कायम करेल हे त्यांच्या मर्जीवर. तसंच शालेय क्षेत्रात खाजगी शाळा उघडल्या आहेत.**

त्यात काही कॉन्व्हेंटच्या तर काही अनुदानीत परंतू मालीक मौजाच्या शाळा आहेत. ज्या सरकारकडून अनुदान तर घेतात. परंतू त्यावर मालकी सरकारची नाही. मालकाची आहे. अशा शाळा ह्या सरकारी असल्या तरी या शाळेत सर्वकाही मालकाच्या मर्जीवर चालते. त्यातही कॉन्व्हेंटचे हाल बघता बघवत नाहीत. कॉन्व्हेंटमधील शिक्षकांचा विचार केला तर तेथील शिक्षकांना घरखर्चाएवढेही वेतन मिळत नाही. तुटपुंजे वेतन मिळतं उच्च शिक्षण असलं तरी. कारण आजच्या काळात शिक्षणाला कोण विचारतं अशी देशाची अवस्था. कारण आज बरीचशी मंडळी उच्च शिकलेली असून बेरोजगार आहेत. तसं पाहता या शिक्षण क्षेत्रानं खाजगीकरण करण्याचं पहिलं पाऊल टाकलं ते जुनी पेन्शन योजना बंद करुन. या योजनेंतर्गत त्यांनी सरसकट लोकांच्या लक्षात न येवू देता जुनी पेन्शन योजना ताबडतोब बंद केली व खाजगीकरणाचं पहिलं पाऊल टाकलं. आता कॉन्व्हेंटच्या शाळा वाढल्यानंतर शिक्षकांची किंमतही चिल्लर केली आहे. असे म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. सरकार पोलीस क्षेत्र सरकारमालकीचं ठेवते की नाही ही देखील एक शंकाच आहे. यामध्येही होमगार्ड पोलीस आणले आहेत. ज्यांना कॉन्ट्रॅक्ट बेसवर बोलावलं जातं व त्यांच्याकडूनही पोलीसांएवढेच कामं करुन घेतली जातात. मात्र वेतन अतिशय अत्यल्प मिळत असतं. ज्यातून घरखर्च भागत नाही. हीदेखील एक शोकांतिकाच आहे. सैनिक क्षेत्र पाहिले असता त्यातही आता त्यांच्या नियुक्त्याच सरकारी स्तरावरच्या नाहीत. आधी करुन दाखवा. मग तुमचे गुण पाहून आम्ही ठरवू की तुम्ही नोकरीला लायक आहात की नाही अशी त्यांची अवस्था. अशी अवस्था प्रत्येकच सरकारी क्षेत्रात आहे. यात जो मालकाची वा साहेबांची मर्जी राखेल त्यालाच नोकरी मिळेल. मर्जीलाही एक विशेष अर्थ आहे. मर्जी याचा अर्थ साहेबाचे नातेवाईक वा ओळखीचं असणं, साहेबाला ते मागतील तेवढा पैसा देणं वा साहेबांची त्यांचा गुलाम असल्यागत कामं करणं. आज ही बाब व हे क्षेत्र सरकारी आहे तरी नोक-या मिळवतांना मालकाची वा साहेबांची मर्जी राखावीच लागते. जर याच बाबीचा विचार करुन आज अस्तित्वात असलेल्या खाजगी क्षेत्राकडे वळून पाहिलं तर आपल्या असे निदर्शनास येते की अशा खाजगी क्षेत्रात नोकरदारांना किंमतच राहात नाही. त्यांची सतत हेळसांड करण्यात येते. ते ओरडूही शकत नाहीत कुणावर. ना वेतनासाठी ना इतर किरकोळ गोष्टीसाठी. त्यातच अशा खाजगी सेवा जनतेलाही लूटलूट लुटत असतात. उदाहरणार्थ खाजगी रुग्णालये. मन मानेल तेवढे शुल्क. खाजगी शाळा. मन मानेल तेवढे शुल्क. म्हणूनच सरकारी क्षेत्र हवं लोकशाही टिकविण्यासाठी. निःशुल्कात उपचार घेण्यासाठी. तसंच निःशुल्क पैशात आपल्या मुलांना शिकविण्यासाठी. लोकशाहीत



स्वतंत्र्यता आहे. प्रत्येक गोष्टीची स्वतंत्र्यता आहे. त्यात व्यक्तीला विचारस्वातंत्र्य आहे. परंतू समजा खाजगीकरण झालंच तर लोकशाहीचे मुल्यच नष्ट होईल अशा सर्वच क्षेत्रातून. गुलामासारखं काम करणा-या माणसांना राबवलं जाईल. तसंच त्यांना वेळेचं बंधन राहणार नाही. तसंच पैशाचंही बंधन राहणार नाही. मग अल्प वेतनात कितीतरी वेळ काम करावं लागेल. तसंच त्यावर एखाद्या व्यक्तीनं किंवा व्यक्तीसमुदायानं आढेवेढे घेतल्यास त्यांना कामावरुन काढलं जाईल कोणतीही विचारपूस न करता. केवळ हेच होणार नाही तर असा व्यक्ती समजा न्यायालयातही गेला तर त्याला दाद मिळेलच असे नाही. कारण अशी मालकशाही व्यवस्था आपल्या वकिलामार्फत न्यायाधीशांचीही खरेदी करु शकते ही शक्यता नाकारता येत नाही.

आज सरकारी सेक्टर आहेत म्हणून बरे आहे. कारण देशातील आजचे लोकसंख्येचे विवरण पाहिले तर आज देशात ८०% जनता ग्रामीण भागात राहते. यातील ७०% जनता गरीब आहे. त्यातील २०% लोकं एवढे गरीब आहेत की त्यांना आपलं पोट भरणं कठीण आहे. २% लोकं आजही रस्त्यावर भीक मागतात. रस्त्यावरच झोपतात. त्यांना साधं घरदारही नाही. तेव्हा ही आजची आकडेवारी पाहता ही आजची गरीब असलेली मंडळी प्रकृती बिघडल्यास खाजगी रुग्णालयात धड उपचार घेवू शकत नाहीत. कारण पैसे नसतात. ते आपल्या लेकरांना खाजगी शाळेत शिकवू शकत नाही. तशीच ही मंडळी आपल्या मुलांना उच्च शिक्षण देवू शकत नाहीत. कारण पैसा लागतो. सरकार अलिकडं हळूहळू खाजगीकरणाकडे वळत आहे. अशावेळेस देशात पुढे जावून संपूर्ण खाजगीकरण झालं तर गरीब, शोषीत व ग्रामीण भागातील जनतेनं जायचं कुठं उपचाराला? त्यांनी आपल्या लेकरांना शिकवावं कुठं? लेकरांना शिकवावं की अडाणी ठेवावं? त्यांनी उच्च शिक्षण घेवू नये काय? त्यांनी नोकरीची अपेक्षा बाळगू नये काय? त्यांनी नोकरी मिळवूच नये काय? त्यांना नोकरी करण्याचा अधिकार नाही काय? वैगेरे सारेच प्रश्न आहेत. आज प्राथमिक शिक्षण सोडलं तर शालान्त शिक्षणानंतर शिक्षण हे निःशुल्क उरलेलं नाही. कितीतरी पैसा मोजून शिकवावं लागतं मुलांना. एवढंही करुन एखाद्या गरीबानं आपल्या मुलांना उच्च शिक्षण दिलंच तर त्यांना नोकरी लागत नाही. सर्व पैशाचा खेळ. म्हणूनच आज गरीबांची मुलं जास्त शिकतांना दिसत नाहीत. ते कामापुरते दोनचार वर्ग शिकतात. त्यामुळं निश्चीतच उच्च शिक्षीत होवून नोकरी गरीबांनी मिळवू नये काय? असा प्रश्न उपस्थीत झाला आहे. त्यातूनच एक मोठी विषमतावादी दरी निर्माण झाली आहे. शिक्षीत व उच्चशिक्षीत. यातही समजा खाजगीकरण झालंच तर लोकं आज जे दोनचार वर्ग शिकवतात. तेही शिकवणार नाहीत. कारण जे काही पैसे लागणार. तेवढेही पैसे मायबाप देवू शकणार नाही शिक्षणाला. त्यामुळं शिक्षण धनिकांचं की गरीबांचं अशी म्हणण्याची वेळ येईल.

महत्वाचं सांगायचं म्हणजे खाजगीकरण त्यात नोकरी करणा-या घटकाला गुलाम बनविण्याची प्रक्रिया आहे. तसंच त्यातून गरीबांचा जिर्णोद्धार दिसत नाही. याचाच अर्थ असा लागतो की खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण. ही गोष्ट आजमितीस लोकांनी लक्षात घ्यायला हवी. कारण जी प्रक्रिया सुरुवातीस घडते. ती छान वाटते. परंतू नंतर तिचे गंभीर परिणाम दिसतात. तेच आज खासगीकरणाच्या प्रथम पावलात दिसत आहे. त्यासाठी वेळीच सावध झालेलं बरं.

# एक टप्पा आऊट



सौ.स्वरांगी स्वानंद मराठे

आधुनिक केसरी

**खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण! होय. खाजगीकरण म्हणजेच गुलामीकरण. कारण ज्यावेळेस खाजगीकरण होईल. त्यावेळेस माणसाच्या योग्यतेचा विचार केला जाणार नाही. जे ओळखीचे आहेत. जे मालकाजवळ चुगल्या सांगतील. जे मालकासोबत चोपडे वागतील. त्यांनाच त्या काळात भाव येईल. आज देशात खाजगीकरण होवू घातलेले आहे. जी विद्यूत आपण वापरतो. ती विद्यूत आज खाजगी झालेली असून ते विद्यूत क्षेत्र कंपन्या चालवीत आहेत. त्यातच आता रेल्वेचंही खाजगीकरण झालं. ज्याप्रमाणे रेल्वे व विद्यूतचं खाजगीकरण झालं. तसाच प्रकार पोलीस, सैनिक व शिक्षण क्षेत्रात आलं आहे. शिक्षण क्षेत्रात शिक्षणसेवक हा प्रकार आलेला असून त्याला सरकार केव्हा कायम करेल हे त्यांच्या मर्जीवर. तसंच शालेय क्षेत्रात खाजगी शाळा उघडल्या आहेत.**

आपण आपलं रोजचं आयुष्य जगताना अनेक लहान मोठे प्रसंग अगदी जाता येता आपल्या आयुष्यात घडत असतात. पण प्रत्येक प्रसंगाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन काय आहे? कसा आहे? हे आपल्यातल्या माणसाची ओळख करून देते. गोष्टी लहान असतात पण त्या आयुष्यभरासाठी चांगला वाईट धडा देऊन जातात. असेच काहीसे प्रसंग आपल्याला शिकवून जातात म्हणा ना!

तनवीर सिद्दिकी यांनी लिहिलेलं एक टप्पा आऊट हे पुस्तक असंच आहे. आपल्या आयुष्याच्या रहाटगाडग्याने आपल्याला आपण माणूस आहे यंत्र नाही हेच विसरायला लावलं आहे. श्रीमंतांकडे पैशाबरोबर अहंकार, इर्षा वाढली आहे आणि सर्वसामान्यांकडे न्यूनगंड. पण या पुस्तकातल्या साध्या घटना वाचून आपल्यात एक वेगळेच बळ येते. ऊर्जा येते. आपण कमकुवत किंवा कमजोर नाही आपण आपल्याला आयुष्यात जे काही हवे आहे ते करू शकतो असा आत्मविश्वास येतो. तसेच नकळत कोणत्या गोष्टीचा गर्व झाला असेल तर तो झटकन मातीमोल होतो.

आज आपण बघतो, आपल्यातला अहंकार इतका वाढलाय की आपल्या जवळच्या लोकांच आपण कौतुक करत नाही किंवा क्षमा याचना किंवा धन्यवाद ही देत नाही मग आपण इतर लोकांना हे बिनधास्त आणि मोकळेपणाने कसे म्हणणार? पण कधीतरी हे करून बघा तुम्हाला खूप समाधान मिळेल जे कशानेही विकत मिळणार नाही. हे पुस्तक आपल्याला नेमके तेच शिकवते.

अनेकदा अनेक प्रसंगांकडे आपण दुर्लक्ष करतो पण तेच प्रसंग आपल्या आयुष्यात कसे अमुलाग्र बदल घडवून आणतात हे पुस्तक तुम्हाला सांगेल. पुस्तकांमधल्या काही कथा मनाला चटका लावणाऱ्या तर काही चटकन डोळ्यात पाणी आणणाऱ्या आहेत. मला नक्की खात्री आहे पुस्तक वाचताना तुम्ही आपल्याही आजूबाजूला अशा घटना घडत असतात. त्यातून आपणही शिकत असतो. याचा विचार कराल. या पुस्तकातील "माणुसकीचा फॅन" हा लेखकाने आपल्याशी साधलेला संवाद तर आपल्या डोळ्यात अंजन घालतो तेव्हा तुम्हाला खरंच असं जाणवेल की कुठे विविध प्रकारचे भेदभाव मानून आपण आपल्याच माणसांना त्रास देतो तर कुठे हा यांचा माणुसकीचा फॅन हा लेख तुम्हाला माणुसकीचा धडा शिकवतो. दुसऱ्याच्या जिवंत स्वप्नांसाठी स्वतः आधी देवाकडे भांडण करणे ही आयुष्याची सर्वात मोठी प्रार्थना आहे हे तुम्हाला जमलं की माणूस पण जमेल. हे या पुस्तकातील सार रुपात असणार सर्वात सुंदर वाक्य.




पुस्तकात तुम्हाला लेखकाची अनेक नाती दिसतील पण सगळी माणुसकीने जपलेली. अगदी दोन ओळीत तुम्ही तुमची स्वप्ने पूर्ण झाले म्हणून स्वतःचं कौतुक कराल, तर दोन ओळीत तुमची अपूर्ण राहिलेल्या स्वप्नांबद्दल खंतही वाटून घेणार नाही." कमाई " शब्द ऐकून आपल्या डोळ्यासमोर फक्त पैशाने कमवलेली संपत्ती असा विचार येतो पण पैशाव्यतिरिक्त अन्य कमाई देखील आपण आपल्या आयुष्यात कमवू शकतो हे पटण्यासाठी तुम्ही यातील कमाई लेख नक्की वाचा तुम्ही तुमच्या जवळच्या माणसाजवळ नक्कीच जाल. लेखकाचे विचार आपल्याला विचार करायला लावणारे आहेत. कुठेतरी ज्या गोष्टी आपल्यालाही वाटत असतात पण त्या लोकांना सांगता येत नाहीत त्याच गोष्टी लेखकाने लहान लहान प्रसंगाच्या रूपाने शब्दात मांडलेल्या आहेत त्यामुळे हे पुस्तक आपल्याला आपलं वाटतं. आपण स्पर्धेच्या जगात इतके उतरलो आहे की नक्की आपल्याला काय मिळवायचं आहे आणि मिळवताना आपण आपलं कुटुंब आपल्यापासून दूर तर जात नाही ना? असे प्रश्न पडणाऱ्या लोकांनी या पुस्तकातली "ऋण काढून सण" ही कथा वाचल्यावर समजेल तुम्ही ज्यासाठी एवढी धडपड करता कुटुंबाला पैशाची श्रीमंती देण्यासाठी देण्यासाठी झगडता पण ती त्यांना हवी आहे का? का त्यांना हवे असतात तुमचे विश्वासाचे दोन शब्द. विचार करा तेच त्यांच्याकडे नसतील तर आयुष्यभर काय कमावलं तुम्ही? नकळत तुमची मुले तुमच्याकडे पाहून शिकतात. त्यांच्या पिढीतही हेच विचार हेच चक्र चालू राहणार आणि त्याच्यापुढे तसेच..... हेच कुठेतरी थांबायला हवं. कुटुंबाची गरज भागवायला हवी. या वाक्याची आपण अतिशयोक्ती तर नाही ना करत? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे तन्वीर सिद्दिकी यांनी आपल्या या पुस्तकात दिलेली आहेत खरंच अतिशय उत्तम लेखन. आपल्यातला माणूस जागा करणारा लेखक. " जगा आणि जगू द्या" हाच विचार त्यांच्या या कलाकृतीतून स्पष्ट होतो. त्यामुळेच की काय या पुस्तकाची 2022 साली 15 आवृत्ती निघुन ही त्याची किंमत सर्वसामान्यांना घेता येईल अशीच आहे. माणसातील माणूसपण हरवत चाललेल्या या जगाला खरच अशा पुस्तकाची गरज आहे. सर्वांनी हे पुस्तक अवश्य वाचा. मला खात्री आहे तुम्हाला हे पुस्तक नक्कीच आवडेल.

# जरा याद करो कुर्बानी...

आधुनिक केसरी

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९२ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव



आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे,**
**९९२२५४६२९५**



# तीर्थस्तंभावर उभारली गुढी

आधुनिक केसरी न्यूज

दादासाहेब घोडके

**पैठण:** सातवाहन साम्राज्याची राजधानी असलेल्या पैठणनगरीतून प्रस्थापित केलेल्या कालगणनेनुसारच 'शालिवाहन शके' हे हिंदू नववर्ष जगभर साजरे केले जाते . पैठणला सम्राटांची पालखी मिरवणूक काढून त्यांनीच उभारलेल्या पुरातन 'तीर्थस्तंभा 'वर गुढी उभारली जाते . यंदा ४१ वे वर्ष आहे. शक कर्ता शालिवाहन राजाच्या दैदिप्यमान कारकिर्दिचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पैठण येथे मराठी नववर्षाचा जनक व पैठण भूमिपुत्र असलेल्या शालिवाहन राजाच्या प्रतिमेसह शालिवाहन शक शुभारंभ शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी पैठण ऐतिहासिक तीर्थखांबावर गुढी उभारून शालिवाहन राज्याच्या तसेच ईतिहास तज्ञ बाळासाहेब पाटील यांच्या प्रतिमेचे पुजन करून परंपरा जोपासण्यात आली. पैठण शहरात असलेल्या शालीवाहनाच्या राजवाड्याच्या बाजूला भव्य अशी दगडी शिल्पाची गुढी उभारली, आज यास तीर्थखांब म्हणून ओलखले जाते. मराठी नववर्षाच्या या दिनाशी शालिवाहनांचा वैभवशाली ईतिहास जोडलेला असल्याने पैठण नगरीस आजच्या दिनाचे महत्व असते.

यावेळीशालिवाहन बँकेचे चेअरमन किशोर चव्हाण, भा.ज.पा चेशहराध्यक्ष शेखर पाटील, रमेश खांडेकर, सागर पाटील, प्रा.संतोष गव्हाणे, प्रा.संतोष तांबे, शहर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष पवनशेठ लोहीया, चेअरमन देवेश ईनामदार, पोलीस निरीक्षक लक्ष्मण केंद्रे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष जितु परदेशी, दिनेश पारिख, मदन आव्हाड, तसेच शहरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# आरोग्य सुविधा देण्यासाठी शासन कटिबद्ध : डॉ.मांडविया

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशात सर्वोत्तम आरोग्य सुविधा देण्यासाठी केंद्र शासन कटिबध्द असून केंद्रीय आरोग्य मंत्रालयाच्या माध्यमातून गावा गावात या सुविधा पोहचविण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन केंद्रीय स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी आज केले.

जीएसटी भवन येथे केंद्रीय स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांच्या हस्ते स्वास्थ केंद्राचे ऑनलाईन उद्घाटन झाले. यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार, वित्त राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, सहकार मंत्री अतुल सावे, खासदार इम्तियाज जलील आदी उपस्थित होते. स्वास्थ केंद्रामुळे मिळणाऱ्या आरोग्य सुविधाबाबत आनंद होतोय असे सांगून डॉ. मांडविया म्हणाले, केंद्र सरकार देशातील प्रत्येक गावात दर्जेदार आरोग्य सुविधा देण्यासाठी सातत्याने काम करते आहे. सहजतेने उपलब्ध होणाऱ्या चांगल्या आरोग्य सुविधा देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. छत्रपती संभाजीनगर व कोईमतूर येथे स्वास्थ केंद्राची सुरूवात झाल्याने या परिसरातील केंद्रीय कर्मचाऱ्यांना या सुविधा मिळणार आहेत. कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी हे स्वास्थ केंद्र महत्वपूर्ण ठरेल. निरोगी भारतीय हेच देशाचे भवितव्य असल्याचेही त्यांनी सांगितले.

वित्त राज्यमंत्री डॉ.भागवत कराड म्हणाले, छत्रपती संभाजीनगर हे एक औद्योगिक शहर तसेच मराठवाडयाची राजधानी आहे. मराठवाडयाच्या या राजधानीलगत 18 ते 20 हजार केंद्रिय कर्मचारी आहेत. या कर्मचा-यांची गेल्या अनेक वर्षापासूनची या स्वास्थ केंद्राची मागणी आज पुर्ण होतेय, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. स्वास्थ केंद्रामुळे केंद्रीय कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळणार आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली देशाने प्रत्येक क्षेत्रासह आरोग्य क्षेत्रातही उल्लेखनीय प्रगती केली आहे. कोरोना कालावधीत आपल्या देशात दर्जेदार आरोग्य सुविधा दिल्या गेल्या. लसीकरणातही देशाने चांगली कामगिरी केली आहे. आरोग्य क्षेत्रातील अनेक नवनवीन उपकरणांचाही पुरवठा गतीने करून कोरोनावर आपण मात केली आहे.

केंद्र शासनाच्या आयुष्यमान भारत योजनेतून पाच लाखापर्यंत विमा कवच देण्यात आपले असून याचाही लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. देशातील प्रत्येक जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून उद्योग, शेती क्षेत्रासोबतच आरोग्य क्षेत्रासाठीही अर्थसंकल्पात निधीची भरीव तरतूद करण्यात आल्याचेही डॉ. कराड म्हणाले.




# ५ व्या भारतीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** धम्म सम्राट फाऊंडेशन, महाराष्ट्र आयोजित ५व्या आखिल भारतीय बौध्द धम्म परिषदेचे आयोजिन शनिवार, दि. २५ मार्च २०२३ रोजी सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत रांजनगांव ( न ) कम्मभुमी, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद ) येथे आयेजित करण्यात आली आहे. धम्म परिषदेसाठी पुज्य भिक्खु धम्मसेवक महाथेरो, मुळावा हे अध्यक्षस्थानी राहणार असुन, धम्म परिषदेचे उद्घाटन पुज्य भिक्खु डॉ.प्र. एम. सत्यपाल महाथेरो यांच्या हस्ते होणार आहे. धम्म परिषदेसाठी पुज्य भिक्खु बुनली महाथेरो ( थायलंड ) यांची प्रमुख उपस्थीतीती राहणार आहे. अशी माहिती धम्म परिषदेचे संयोजक भिक्खु शाक्यपुत्र अमृतानंद बोधी ( सदस्य, आखिल भारतीय भिक्खु संघ, बुध्दगया ) व व्यवस्थापण व स्वागताध्यक्ष पोपट बी.दुशिंग ( उपसंरपंच तथा उद्योजक, रांजनगाव नरहरी ) यांनी दिली. धम्म परिषदेचे धम्म ध्वजारोहन ( सकाळी १० वा ), भिक्खु संघाचे भोजन ( सकाळी ११ वा ), बोधीवृक्ष पुजन व दिप प्रज्वलन ( दुपारी १२ वा ), धम्मसम्राट स्मरणीका प्रकाशन सोहळा, धम्मभूषण पुरस्काराचे वितरण, उपस्थित भिक्खु संघाची धम्मदेसना ( दुपारी १ वा ). मंगलमैत्री व राष्ट्रगीत ( सायं. ६ वा ), 'ही रात्र वामनाची' विशेष कार्यक्रम ( रात्री ७.१० वा ) अशा प्रकारे धम्म परिषदेच्या कार्यक्रमाची रुपरेषा असेल. सामाजीक जान ठेवून विशेष कार्य केल्या बद्दल आयु. डॉ. सुनिल उबाळे ( गंगापूर ), आयु. भिमराव हत्तीअंबीरे ( अध्यक्ष, संबोधी अकादमी ), आयु. अनिलकुमार साळवे ( दिग्दर्शक ), आयु. डॉ. प्रा. गौतम गायकवाड ( शासकीय अध्यापक महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर ), आयु.एल.एम.गायकवाड ( अध्यक्ष, पद्मपाणी सामाजीक संस्था ) यांना धम्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच आयु. नित्यानंद उबाळे ( सहाय्यक पोलीस निरीक्षक, जालना ), आयु. विशाल खाजेकर ( पोलीस उप-निरीक्षक, अंधेरी ( प ), मुंबई ), आयु. दिव्या कोळसे ( परिवहन अधिकारी ), आयु. सनी गायकवाड ( आदर्श शिक्षक ) यांचाही विशेषरित्य सत्कार करण्यात येणार आहे.

धम्म परिषदेसाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थितीती राहणार आहे. धम्म परिषदेचे अध्यक्ष भिक्खु शाक्यपुत्र अमृतानंद बोधी, आयु. नितीन जाधव ( उपाध्यक्ष ), आयु. प्रा. डॉ. संदीप गायकवाड ( सचिव ), आयु. ए.टी.पगारे, आयु. रंजक सिरसाठ, आयु. लक्ष्मण उबाळे, आयु. संजय आल्हाट, आयु. संजय कांबळे ( सर्व सदस्य ) हे सर्व धम्मउपासक या धम्म परिषदेचे व्यवस्थापण करीत आहेत.

धम्म परिषदेच्या निमीत्ताने भोजन, पाणी, निवास करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर युवा मंच, रांजनगाव ( न ) ही समिती या बाबींचे व्यवस्थापण करणार आहे. सर्व धम्म उपासकांना आवाहन करण्यात येते कि, या धम्म परिषदेसाठी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करुन उपस्थित राहावे, अधिक माहितीसाठी मो. ९६३७६२६४९७ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# त्या रस्त्याचे काम बंद पडूनच, बांधकाम विभाग झोपेत

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी ते ताजनापूर फाटा शेरोडी रस्ता या रस्त्यावर ठेकेदार खड्डे भरताना रस्त्यातील खड्ड्याची स्वच्छता न करता व डांबर न टाकता सरळ खड्ड्यात खडी टाकुन थातुरमातुर काम आटोपते घेण्याचा प्रकार होत असल्याने नागरिकांनी खड्डे भरणा काम बंद पाडले. आता त्यास दोन आठवडे उलटले ना ठेकेदार ना सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी याकडे लक्ष दिले नाही दोघांनी कामाकडे पाठ फिरवली असल्याने काम ठप्प पडून आहे व ये जा करतांना वाहनधारक व प्रवासी यांना प्रवास करताना त्रास सहन करावे लागत असल्याचे चित्र आहे. बाजार सावंगी-ताजनापूर ते शिरोडी या रस्त्याचे कित्तेक महिने काम झाले नाही.त्यामुळे सर्वत्र दोन ते तीन फुटाचे लांब रुंद खड्डे पडले आहे खडी उखडलेले स्थीतीत पडून असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाकडून डांबरीकरण केलेला रस्ता असल्याने डांबर व खडीने खडडे भरण्यासाठी ठेकेदाराला काम देण्यात आले. परंतु ठेकेदार यांने कोरडी खडी टाकत खडडे भरणा काम आटोपती घेण्याचा धडाका लावला होता. हा प्रकार नागरिकांच्या लक्षात आल्याने नागरिकांनी थातुरमातुर व विना डांबराचे काम बंद पाडले.

दोनतीन आठवडे उलटले मात्र ना ठेकेदार ना सार्वजनिक बांधकाम विभाग दोन्हीनी कामांकडे पाठ फिरवली व काम ठप्प तसेच पडून असुण ये जा करतांना त्रास सहन करावे लागत आहे. याकडे वरिष्ठांनी लक्ष घालून हा काय प्रकार सुरु आहे.याची चौकशी करून खड्ड्यांची साफसफाई व डांबर मिश्रीत खडी टाकून खड्डे बुजवावे असी मागणी होत आहे.



# बाजार सावंगी प्रा. आरोग्य केंद्राला जिल्हाधिकाऱ्यांची अचानक भेट

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी दि. 21 मार्च जिल्हाधिकारी आस्तिक कुमार पांडे यांचा कन्नड तालुक्यातील दौऱ्यावर असून अचानक खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी प्राथमिक आरोग्य केंद्र व पशुवैद्यकीय दवाखान्याची केली पाहणी व कामकाजाचा आढावा घेऊन संबंधितांना सूचना केल्या व झालेल्या अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या पिकाची पाहणी करून तलाठी व मंडळाधिकाऱ्यांना पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी जनार्दन विधाते तहसीलदार सुरेंद्र देशमुख तलाठी सायली विटेकर आरोग्य अधिकारी अंजुमन निलोफर सरपंच आप्पाराव नलावडे, पत्रकार सय्यद लाल, विश्वंभर नलावडे उपस्थित होते.





# युवासेनेकडून उभारण्यात आली लोकशाहीची गुढी..!

## नवीन वर्षाची गुढी उभारून विरोधकांना आगळावेगळा संदेश

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** हिंदू नववर्ष व गुढीपाडव्याच्या निमित्ताने धुळे शहरातील मध्यवर्ती चौक असलेल्या जयहिंद महाविद्यालय चौकात धुळे जिल्हा युवासेनेच्या वतीने गुढी उभारण्यात आली. यावेळी लोकशाहीचे पालन करण्यासाठी सत्ताधारी सरकारला युवासेनेच्या वतीने संदेश देण्यात आल्या. ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स, निवडणूक आयोग व पोलीस प्रशासनाचा गैरवापर करून लोकशाहीच्या नीती मूल्यांची पायमल्ली करणाऱ्या धुळ्यातील, राज्यातील व केंद्रातील भाजप सरकारला असा संदेश देण्यात आला नागरिक जर जागरूक झाले नाहीत तर आपला देश देखील हिटलरशाही कडे जाईल त्यामुळे तमाम हिंदू बंधू व भगिनींनी लोकशाही वाचविण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे, असेही यावेळेस म्हणाले.यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, उपजिल्हाप्रमुख किरण जोंधळे,उपमहानगरप्रमुख संजय जवराज मान्यवर स्थानी उपस्थित होते. या प्रसंगी युवासेनेचे जिल्हाप्रमुख हरीष माळी, युवासेना उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, योगेश मराठे, सिद्धेश नाशिककर, शुभम फुलपगारे, वैभव चव्हाण, जयेश फुलपगारे, योगेश फुलपगारे, सोमेश कानकाटे, समर्थ मुर्तडक, हर्षल साळुंखे, मयूर फुलपगारे, अमोल शिंदे, कुंदन प्रजापत, दुर्वेश चव्हाण, आमीन शेख, प्रीतम लोखंडे, शंतनू भडागे, दादू मराठे, गौरव चौधरी, जितेंद्र काकडे, हर्षल फुलपगारे यांचेसह परिसरातील शिवसैनिक युवासैनिक उपस्थित होते.

# घनसावंगी तालुक्यात अवकाळीचे ढग कायम; शेतकऱ्यांची वाढली चिंता

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यांमध्ये सद्ध्या अवकाळी पावसाचे ढग कायम आहेत. मागच्या आठवड्यात काही ठिकाणी रिमझिम पाऊस झालेला असून वाऱ्याने हातात तोंडाशी आलेला घास हिसकावण्याचा प्रयत्न केला आहे. सध्या शेतामध्ये गहू ,ज्वारी, हरभरा,कांदा या पिकांची काढणी सुरू असून सर्वत्र लगबग सुरू आहे तसेच मोसंबी, आंबा ,द्राक्ष या फळबागाची प्रचंड नुकसान झालेले असून राहिली कसर आणखीन हा अवकाळी पाऊस सध्या शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिसकावण्याचा प्रयत्न करत आहे. तालुक्यातील मच्छिंद्रनाथ चिंचोली, देवी दहेगाव, खडका, बोडखा, कुंभार पिंपळगाव, जांब समर्थ, राणी उचेगाव, रामसगाव, तीर्थपुरी, भोगाव, मंगरूळ, राजा टाकळी, ढाकेफल, राजेगाव, जिरडगाव सहित तालुक्यातील 114 गावांत अवकाळी पावसाचे ढग कायम आहेत आता तोंडाशी आलेला घास हिरावण्याची भीती शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.म्हणून सध्या शेतकरी रात्र दिवस धावपळ करून गहू, जवारी आणि हरभऱ्याची पिक काढण्याच्या तयारीत आहेत. राजेगाव येथे शेतकरी प्रदीप पडले यांनी दैनिक केसरी बोलताना सांगितले की सध्या शेतामध्ये गव्हाची काढणी सुरू आहे परंतु आकाशात अवकाळी पावसाचे ढग आहेत,मजूर मिळत नाहीत आणि अशातच जर का पाऊस पडला तर हातात तोंडाशी आलेला घास हीस्कावण्याची भीती आहे महागडे बीज कीटकनाशक आणि खताचा वापर करून खर्च केलेला आहे.



# खासदार निधीतून सिमेंट रस्त्याचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नपूर :** डॉ. भागवतजी कराड साहेब केंद्रीय अर्थ राज्यमंत्री (भारत सरकार) यांच्या खासदार निधीतून येसगाव नं 1 ( ता. रत्नपूर ) येथे 10 लक्ष रू सिमेंट रस्त्याचे लोकार्पण हर्षवर्धनजी कराड यांच्या हस्ते करण्यात आले. या उद्घाटन सोहळ्यानिमित्त भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, जि.प उपाध्यक्ष एल. जी.गायकवाड, दिनेश अंभोरे, प्रभाकर शिंदे,सरपंच जिज्ञासाताई काळे, उपसरपंच सुनिता खंडागळे, शांताबाई बोबले, सलमान शेख, शंकर खंडागळे, विलास काळे, संदिप निकम, अविनाश वेताळ,राहुल चव्हाण, अंकुश काळे, योगेश काळे, संजय खंडागळे, ज्ञानेश्वर खरात, विजय आव्हाड, प्रकाश आव्हाड, विजय चव्हाण, बाबाजी कायस्थ, विलास आव्हाड,रावसाहेब देशमुख, अंकुश काळे, सतिश खंडागळे उपस्थित होते.

# रमजान महिन्यात लोडशेडींग करू नये



आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** येत्या 23 मार्चपासून रमजान महिना सुरू होत आहे. हा मुस्लिमबांधवांचा पवित्र महिना असतो. पहाटेच उठून उपवासाची तयारी करावी लागते. यामुळे या महिन्यात महावितरण विद्युत कंपनी लोडशेडींग करू नये, अशी मागणी मुस्लिम शिष्ट मंडळाने धर्माबाद महावितरण कंपनीचे अभियंता ,सुमित पांडे, प्रणय काळे यांच्याकडे केली आहे. धर्माबाद तालुक्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवावा, या कालावधीत लोडशेडिंग करू नये व मोहल्लामधील सर्व पथदीप बंद आहेत, ते त्वरित सुरू करावेत, संपूर्ण धर्माबाद तालुक्यात स्वच्छता मोहीम राबवून संपूर्ण परिसर स्वच्छ ठेवावा अशी मागणी नगरपरिषद मुख्याधिकारी नीलम कांबळे यांच्याकडे केली जात आहे.

RAHUL S. ANCHALKAR
9850500629, 9325727798
R.R. Enterprises
घर तुमचे... इंटरीयर आमचे !
आपल्या घरातील आतील संपूर्ण सजावट आम्ही करू, वेल डेकोर फर्नीचर, किचन ट्रॉलीज, सोफा, बेड सर्वकाही तुमच्या स्वप्नाप्रमाणे
Add. : N-8, Behind Onkar Gas, CIDCO, Aurangabad-431 003
E-mail : anchalkarrahul@gmail.com
Web:rrenterprises.com

# दिनदूबळ्यांच्या सेवेने आत्मिक समाधान : संजय महाराज हिवराळे

आधुनिक केसरी न्यूज



**भोकर :** मानव धावपळीचे जीवन जगत असल्याने वेळ मिळत नाही, अशा परिस्थितीत प्रत्येक जण सुखाचा मार्ग शोधत आहे. परंतु जीवन जगत असताना जीवनात अनेक चढ उतार येतात. भगवंताचे नामस्मरण, संत संगती केल्याशिवाय समाधान लाभत नाही.दिन दुबळ्यांची सेवा केली तरच आत्मिक समाधान लाभते, असे प्रतिपादन भागवत कथाकार संजय महाराज हिवराळे आळंदीकर यांनी बुधवारी (ता २२) केले आहे कामनगाव (ता.भोकर) येथे हनुमान मंदिर कळशारोहणा निमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहातील श्रीमद् भागवत कथा सूरू आहे त्यावेळी ते बोलत होते.

हिवराळे म्हणाले की, कलियुगातील तरुण वेगळ्या दिशेने धावत आहे व्यसनाधीन झालेल्या तरुणांना संत संगती आणि संत चरित्राचा अभ्यास झाल्याशिवाय मनाला समाधान लाभत नाही. भरकटलेल्या जीवाचा उद्धार करून घेण्यासाठी श्रीमद् भागवत कथा श्रवण केली पाहिजे. भागवत कथा श्रवणाने मेलेल्या माणसाला देखील मुक्ती मिळते असे सांगितले.सोमवारी (ता. २७) सकाळी हनुमान मंदिराचा कलशारोहणाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर काल्याचे किर्तन, महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे. धार्मिक सोहळा यशस्वी करण्यासाठी कामनगाव येथील समस्त गावकरी मंडळी प्रयत्न करीत आहेत.

# परभणी जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासनासह राज्य उत्पादन शुल्क विभाग अदृश्य ?

## भेसळयुक्त दुध/तुप खाद्यतेल आदींसह विविध भेसळयुक्त खाद्य पदार्थांची सर्रास विक्री

आधुनिक केसरी न्यूज

**चौधरी दिनेश**

**परभणी :** जिल्ह्यात सर्वत्र भेसळयुक्त पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याचे निदर्शनास येत असून खाद्य पदार्थ विक्रेत्यांनी ठरवून दिलेल्या मनमानी दराप्रमाणे पैसे देऊन देखील नागरिकांना भेसळयुक्त खाद्य पदार्थांची विक्री केली जात असल्यामुळे जिल्ह्यात अन्न व औषधी प्रशासनाच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण होतांना दिसत असून अन्न व औषधी प्रशासना प्रमाणेच जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कर्तव्यावर देखील प्रश्न उपस्थित होतांना पाहावयास मिळत आहे. परभणी जिल्ह्यात पुर्णा, पालम, गंगाखेड, सेलू, मानवत, जिंतूर, सोनपेठ या सात तालुक्यांचा समावेश असून जिल्ह्यातील सातही तालुक्यात भेसळयुक्त खाद्य पदार्थ ज्यात दुध, दही, तुप, खुले खाद्य तेलासह बेकायदेशीररित्या पाकीटबंद केलेले भेसळयुक्त गोडतेल, मिरची, हळद पावडर मसाले, बेसनपीठ, गहू/ ज्वारी/ बाजरी पिठ आदींसह विविध भेसळयुक्त खाद्य पदार्थ संबंधित विक्रेत्यांनी ठरवून दिलेल्या मनमानी दराने खरेदी करून देखील नागरिकांना निकृष्ट दर्जाचे व भेसळयुक्त खाद्य पदार्थ विक्री केले जात असल्यामुळे नागरिकांना आरोग्यावर याचे भयंकर परिणाम होत असून जिल्ह्यात अनेक तालुक्यात काही कायदेशीर तर काही बेकायदेशीर दुध विक्री केंद्र चालत असून या दुध विक्री केंद्रांवर दुधाला प्रती लिटर ७० रुपयें प्रमाणे भाव देऊन देखील दुध ग्राहकांना अत्यंत निकृष्ट दर्जाचे व भेसळयुक्त दुध विक्री केले जात असून या दुधाची अक्षरशः दुर्गंधी येत असल्यामुळे संबंधित दुध विक्रेते या दुधात नेमका कोणते पदार्थ/केमिकल मिसळत आहे याकडे लक्ष द्यायलाच कोणी तयार नाही अशीच अवस्था तुप विक्रेत्यांची देखील झाली असून गावरान तुपाची विक्री करणारे तुप विक्रेते प्रती किलो आठशें रुपयें दराने तुप विक्री करीत असून तेही भेसळयुक्त त्यामुळे या भेसळयुक्त दुध/दही/तुपासह विविध खाद्य पदार्थांचा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. परभणी जिल्ह्यात सर्वत्र भेसळयुक्त खाद्य पदार्थ विक्रेत्यांनी अक्षरशः धुमाकूळ घातल्याचे निदर्शनास येत असतांना परभणी जिल्हा अन्न व औषधी प्रशासनाचे अधिकारी सरकटे यांच्या कार्य तत्परतेवर गंभीर प्रश्न निर्माण होत असून भेसळयुक्त खाद्य विक्रेत्यांना जिल्हा अन्न व औषधी प्रशासनाचे अधिकारी/कर्मचारी आर्थिक हितसंबंध जोपासत पाठबळ तर देत नाहीत ना ? असा प्रश्न जनसामांन्यात उपस्थित होत आहे शासनाने खुल्या गीडतेल विक्रीवर बंदी घातलेली असतांना देखील जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अक्षरशः टँकरने खुले तेल असून या भेसळयुक्त तेलाची काही दुकानदार पाकीट बनवून तर काही दुकानदार खुल्या स्वरुपात मनमानी दराने विक्री करताना पाहावयास मिळत आहे.



### परभणी जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागही अदृश्य

परभणी जिल्हा अन्न व औषधी प्रशासनासह परभणी जिल्हा राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्य तत्परतेवर जिल्ह्यात सातत्याने प्रश्न चिन्ह निर्माण होत असून जिल्ह्यातील पुर्णा, पालम, गंगाखेड, सेलू, मानवत, जिंतूर, सोनपेठ या सातही तालुक्यात सर्वत्र खानावळीच्या नावावर चालणाऱ्या धाब्यांसह शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात अवैध देशी/विदेशी दारुसह भेसळयुक्त बनावटी दारुची खुलेआम विक्री होत असताना जिल्ह्यातील राज्य उत्पादन शुल्क अधिकारी रवी किरण कोल्हे, निरिक्षक सुशिल चव्हाण, निरिक्षक गणेश कुफे, शेख अश्रफोद्दीन, आलाट, भरारी पथकातील पुसे, मंडलवार हे अधिकारी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास येत असून त्यांच्या अकार्यक्षम कारभारामुळे जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभाग कार्यरत आहे की नाही ? असाही प्रश्न निर्माण झाला आहे.

# शांतीब्रम्ह एकनाथ महाराज समाधी मंदिरातील प्रसादालय अखंड सेवेला सहा वर्षे पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** संस्थान श्री एकनाथ महाराज विश्वस्त मंडळ संचलित, हरिकृपा सेवा समिती शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज प्रसादालय (अन्नछत्र)मंडळाने तसेच महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी तथा फलोत्पादन व संभाजीनगरचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांच्या संकल्पनेतून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सुरवात केलेल्या अन्नछत्र सेवेला बुधवार दि.22 मार्च रोजी आज सहा वर्षे पुर्ण होत आहे. नाथसमाधी मंदिराला भेट देऊन दर्शनास येणाऱ्या हजारो भाविक-भक्तांना या अन्नछत्रालय चा लाभ घेत आहेत तसेच परिसरातील अनेक गोरगरीब नागरिक, कामगार, मजूर अखंड अन्नछत्रालयचा लाभ घेत आहे नाथ मंदिराच्या लगतच असलेल्या सुसज्ज अश्या इमारतीत अन्नछत्रालय सुरू करण्यात आले आहे एकाच वेळी शेकडो लोकांना महाराष्ट्रातील आणि देशभरातील भाविकांना हा महाप्रसाद अनेक दानशुरांच्या सहायोगातुन पुर्णत्वाकडे जात आहे. श्री हरीकृपा सेवा समिती चे सदस्य तसेच अनेक दानशुर भक्त मोठ्या श्रध्देने शांतिब्रम्ह संत एकनाथ महाराजांच्या चरणी ही अन्नदानाची सेवा देत असुन नित्य भोजन दुपारी १२ ते ३ वाजेच्या दरम्यान गेल्या सहा वर्षापासून अखंड कार्यरत आहे.कोरोना काळात या अन्नछत्रालयाचा अनेक भक्तांनी नागरिकांनी लाभ घेतला आहे.याठिकाणी सेवेकरी म्हणून काम पाहत असलेले अंकुश सेलुकर, भगवान मिटकर, शिवाजी कोलते, सर्जेराव सोनवणे, विठ्ठल परदेशी, गणपत मिटकर, प्रवीण उदावंत, लक्ष्मण लाड, विजय मुळे, बाबुराव बोंबले, जगन्नाथ काकडे, मारोती मोमेडवार, अंकुश म्हस्के, जिजा मिसाळ, अर्जुन भोसले, गुलाब सातपुते, पंडित औटे, बाबासाहेब शिंदे, संभाजी गव्हाणे, मुकुंद ठोसर, लिंबाजी चौधरी, परसराम करडवाल, हे अन्नछत्रालयात सेवेकरी म्हणून काम पाहतात.



**केंद्र सरकारचे भोग प्रमाणपत्र :** भारतीय अन्न सुरक्षा प्राधिकरण यांच्या वतीने घेण्यात आलेल्या देश पातळीवर इट राइट स्पर्धेत पैठण येथील संत एकनाथ महाराज मंदिरातील हरिकृपा सेवा समितीच्या अन्नछत्र ला स्वच्छ प्रसाद निर्मिती आणि वाटपासाठी केंद्र सरकारकडून भोग प्रमाणपत्र देण्यात आले आहे. गुढीपाडव्या मुहूर्तावर सुरू झालेल्या पैठण येथील अन्नछत्रालयात दररोज जवळपास १५०० भाविक अन्नदानाचा लाभ घेतात त्याप्रमाणे गेल्या सहा वर्षात ३२ लाखाच्या पार भाविक भक्तांनी लाभ घेतला.

### अन्नछत्रालयास काहीच कमी पडू देणार नाही

महाराष्ट्र राज्याचे रोहयो कँबेनेटमंत्री संदीपान भुमरे यांनी सहा वर्षापुर्वी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नाथ महाराज समाधी मंदीरात शिर्डी, शेगावच्या धरतीवर पैठणला येणाऱ्या वारकरी भाविकासाठी आन्नछत्रालयाची पहीली पंगत देवुन सुरवात केली. या अखंडपणे चालु असलेल्या अन्नछत्रालयास काहीच कमी पडु देणार नाही नाथाच्या दरबारी अन्नदानाचा अखंड अन्नदानाचा यज्ञ भाविकांसाठी सुरुच राहणार आसल्याचे सांगितले.

### कोरोना काळात दिली पार्सल सुविधा

कोरोना काळात आरोग्य कर्मचारी, एस.टी.कर्मचारी, तसेच कॉरन्टाईन असलेले काही कुटुंबाना पोळी, भाजी पार्सल सुविधा करण्यात आली होती. पैठण येथील अन्नछत्रालयास राष्ट्रसंत हरिचैतन्य महाप्रभु, राजस्थान. किशोरजी व्यास, भास्करगीरी महाराज, देवगड स्थान व आदी संत महंतानी भेटी देवुन प्रसादाचा लाभ घेतला आहे.

## जाहीर प्रगटन

माझे आशिल कैलास मनमथआप्पा दारूवाले राहणार राजुर तालुका भोकरदन जिल्हा जालना यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस कळविण्यात येते की त्यांचेकडून दिनांक 10 फेब्रुवारी 2023 गाडेगव्हाण ते राजूर या मार्गादरम्यान गट क्रमांक 74 मौजे गाडेगव्हाण तालुका जाफ्राबाद जिल्हा जालना ह्या मिळकतीचे मूळ विक्रीपत्र नोंद क्रमांक 3262/2005 दिनांक 14/ 05/ 2005 दुय्यम निबंधक जाफ्राबाद यांचेकडे नोंद केलेली प्रवासादरम्यान गहाळ झालेले आहे. सदर खरेदीखत गणेश साहेबराव वरशीळ यांनी नारायण मारोती दहातोंडे यांच्या हक्कात करून दिलेले होते. तरी पुन्हा कळविण्यात येते की, सदरचे दस्त कोणालाही भेटले असल्यास ते माझे आशिलाकडे किंवा कार्यालयः एफ/12, धनवर्षा चेंबर्स, सरोजिनी देवी रोड जालना येथे 5 दिवसात आणून द्यावा अथवा कळविणे. जेणेकरून माझे आशिलास प्राप्त करता येईल.

दिनांक 20 /03 /2023, सही

अ‍ॅड.आर.सी.साबू

# सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी महाविद्यालय, अंबड येथील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक टूर

आधुनिक केसरी न्यूज



**अंबड :** येथील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक टूर आज दि.२२-०३-२०२३ रोजी आहेरमल, रामसगाव या ठिकाणी संपन्न झाला. यावेळी विद्यार्थ्यांनी आहेरमल या ठिकाणी भेट दिली. आहेरमल या ठिकाणी चक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पावन झालेले हे क्षेत्र असून या स्थळाला ऐतिहासिक वारसा आहे. रामसगाव या ठिकाणी पूर्वी संगमेश्वराचे तीर्थक्षेत्र होते. या ठिकाणी चक्रधर स्वामींचे दहा दिवस वास्तव्य होते. मराठीच्या आद्य कवयित्री महदंबा यांचे हे गाव असून आजही या परिसरात महदंबेच्या आठवणी साक्ष देणाऱ्या आहे.

जोगलादेवी या ठिकाणी चक्रधर स्वामींनी गुडीपाडव्याचा सण साजरा केल्याची नोंद लीळाचरित्रात सापडते. महानुभाव साहित्याच्या दृष्टीने घनसावंगी परिसर अतिशय महत्त्वाचा आहे. जिल्ह्यातील ऐतिहासिक, अध्यात्मिक स्थळे आजही खूप दुर्लक्षित आहे. अशा या समृद्ध वारशाकडे आपण डोळसपणे पाहिले पाहिजे अशी भावना या शैक्षणिक टूर निमित्त प्रा.भारतभूषण शास्त्री यांनी व्यक्त केली. या दरम्यान मॉडेल डिग्री कॉलेज घनसावंगी येथील हिंदी विभागप्रमुख डॉ. कानूलाल विठोरे सर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.समर्थ रामदासांचे जांब समर्थ, आद्य कवयित्री महदंबेचे रामसगाव, आचार्य नागदेवांची पुरी पांढरी, रामनंदाची गोंदी आदी प्राचीन आणि मध्ययुगीन स्थळांची सरांनी माहिती विद्यार्थ्यांना दिली. ऐतिहासिक आणि धार्मिक अशा या आहेरमल गड हे घानसावंगी पासून अवघ्या सात ते दहा किलोमीटर अंतरावर असून या ठिकाणी शासन प्रशासनाचे पूर्णतः दुर्लक्ष असून भौतिक सुविधा या ठिकाणी नाहीत तसेच महानुभव पंथ यांची संबंधित अध्ययन अध्यापन आणि संशोधन होणे ही काळाची गरज आहे मराठी भाषा आणि साहित्य सांस्कृतिक मंडळाच्या वतीने तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने या ऐतिहासिक स्थळा चा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. अहेरमनगर या ठिकाणी पाण्याची जर व्यवस्था करण्यात आली तर निश्चितपणे पर्यटन वाढेल पर्यायी महानुभव पंथीयातील अभ्यासकांना आणि येणाऱ्या भाविकांना त्यांची सोय होईल.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# वृक्षतोड करतोय कोण ठेकेदार की शासन ?

## प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या इमारतीचा मुद्देमाल नागरिकांनी केला लंपास

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** फुलंब्री तालुक्यातील वडोदबाजार येथील वडोद बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत होणार असून या ठिकाणी जुन्या बांधकामा असलेली जुनी इमारत पाळण्यात आली असून या इमारतीला असलेले खिडक्या दरवाजे इतर साहित्य नागरिकांनी लंपास केले आहे इमारत पाडण्याचे काम सुरू असताना नागरिकांनी येथील साहित्य लंपास केले आहे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्याने नागरिकांनी येथील शासनाचा मुद्देमाल लंपास केला आहे यामुळे शासनाचा लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास झाल्याचा प्रकार उघड झाला असून परिसरात असलेल्या वृक्षाची तोड अवैध्य सुरू असून वृ वृक्ष तोडूनही नागरिक घेऊन जात आहे मात्र याकडे प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी वरिष्ठ अधिकारी दुर्लक्ष करत असल्यामुळे या ठिकाणी इमारतीचे बांधकाम असलेल्या ठिकाणी





जुन्या इमारतीचा निघालेला मुद्देमाल जमा न करता याकडे दुर्लक्ष केले यामुळे या ठिकाणी असलेल्या मुद्द्यामालाची चौकशी करण्यात यावी व दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी आता सुज्ञ नागरिकांकडून होत आहे या प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्याने लक्ष देऊन चौकशी करण्यात यावी व या परिसरातील वृक्षतोड केल्याप्रकरणी यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे वडोद बाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात नवीन इमारत होणार असून या परिसरात असलेल्या दोन जुन्या इमारती पाडण्यात आला असून या जुन्या इमारतीतून निघालेला मुद्देमाल दरवाजे खिडक्या लोखंड इतर साहित्य जमा करून ठेवणे आवश्यक असतानाही प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले यामुळे येथील परिसरातील काही नागरिकांनी येथील लोखंड दरवाजे खिडक्या इतर साहित्य लंपास केले आहे यामुळे शासनाच्या लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास झाल्याचा प्रकार उघड झाला आहे तर शासन एकीकडे वृक्ष लागवड करण्यासाठी प्रोत्साहन देते व वृक्ष लागवडीवर शासनाकडून भर दिला जात आहे झाडे लावा झाडे जगवा असा संदेशही शासनाकडून दिला जातो असे असताना दवाखान्याच्या परिसरात असलेले मोठमोठे वृक्ष तोडले जात आहे.



# मॉडेल कॉलेजचे विद्यार्थी आझाद हिंदची गाथा नाटक करणार

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय राष्ट्रीय सेवा योजना आणि आर्टिस्टक हुमेंस यांच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यातील एक हजाराहून अधिक विद्यार्थी कलाकार व नाट्य निर्मिती 36 जिल्ह्यात एकाच दिवशी 75 महाविद्यालय 75 ठिकाणी 75 नाट्य प्रयोग उद्या ठीक 12 वाजता सादर करणार आहेत. या अनोख्या प्रकल्पाचे अंतर्गत नाट्य सादरीकरणासाठी जालना जिल्ह्यातून मॉडेल कॉलेज घनसावंगी ची निवड करण्यात आलेली असून महाविद्यालयातील 14 विद्यार्थी हे नाटक सादर करणार आहेत .देशाच्या स्वातंत्र सैनिकांच्या बलिदानाचा सन्मान करण्याचा एक दिवस म्हणून भारताच्या प्रवासाची कहाणी आणि अमृत महोत्सवाची भावना साजरी करण्याची संधी महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनाय आर्टिस्ट्यूमन्स व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ही संधी मॉडेल कॉलेज घनसावंगी ला मिळाली आहे . यांनीमित्ताने महाविद्यालयातील 14 विद्यार्थी," आझाद हिंद ची गाथा "ही नाटिका सादर करणार आहेत.

प्राचार्य डॉ.सतीश दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक बाळासाहेब वरखडे, डॉ. संतोष गायकवाड आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.कन्नूलाल विटोरे,प्रा उदय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली उद्या 23 मार्च रोजी 12 वाजता या नाटकाचे मंचन महाविद्यालयात होणार आहे. याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महिलांच्या आर्थिक सबलीकरणाने देश विकासाचे उंच शिखर गाठेल

## उपविभागीय पोलीस अधिकारी आय.पी.एस. महक स्वामी

आधुनिक केसरी न्यूज



**वैजापूर :** महिला विकासाच्या केंद्र बिंदू आहेत, त्यांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देऊन प्रशिक्षित केल्यास व त्यांच्याद्वारे निर्मित वस्तूला प्राधान्य क्रमाने बाजारपेठ उपलब्ध करून दिल्यास देशाचे आर्थिक सबलीकरण होण्यास वेळ लागणार नाही असे प्रतिपादन तालुक्यातील जीवन विकास महाविद्यालय शिवूर येथील व्यवसाय प्रशिक्षित महिलांना प्रमाणापत्र वितरण कार्यक्रमात वैजापूर उपविभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी आय.पी.एस. महक स्वामी यांनी मंगळवार( ता.२१ ) रोजी महाविद्यालयात केले. त्या पुढे म्हणाल्या की, महिलांनी चुकीच्या मार्गाने न जाता अंगच्या कौशल्य आधारे वस्तू निर्मित करून स्वाभिमानाने जगावे,आपल्या मुलांवर योग्य संस्कार करून त्यांना उच्च शिक्षण द्यावे, प्रमुख पाहुणे उपविभागीय दंडाधिकारी माणिक आहेर यांनी ही विशद केले की जगाच्या एका पाहणीत असे दिसून आले आहे की, या पुढे पैशाने श्रीमंत असणाऱ्यांचे स्थान दुय्यम राहणार तर चारित्र्य ने श्रीमंत असणाऱ्याचे स्थान समाजात अति उच्च राहणार आहे, महिलांनी प्रशिक्षण मधील ज्ञानातून स्वावलंबी व्हावे,व समाजात उच्च स्थान प्राप्त करावे ,या समयी माजी आमदार तथा राष्ट्रवादी चे जिल्हा अध्यक्ष कैलास पाटील,निर्मला इन्स्टिटयूट च्या नॅन्सी रोद्रीग्ज,सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांनी ही महिलांना संबोधित करून महिला सक्षमीकरण व महिला सबलीकरण , यावर जोर देत महिलांनी धीट, सुदृढ,व सबल होऊन आपला व कुटुंबाचा सर्वांगीन विकास साधावा असे आवाहन केले, अध्यक्षस्थानी जे,के,जाधव विकास मंचचे जे,के,जाधव होते,दोनशे महिलानी विविध व्यवसाय प्रशिक्षण घेतले असून त्या गृह उद्योगातून अर्थार्जन करून स्वावलंबी बनत आहेत,या प्रसंगी ऐश्वर्या व्यवहारे, कल्पना पवार,तेजल पगारे, द्वारका पवार, तेजस्विनी कुलकर्णी यांनी आपले प्रशिक्षण नंतरचे वस्तू तयार करून विकण्याचे अनुभव कथन केले.

# जेज क्वार्टरची जागा पत्रकार भवनसाठी आरक्षित करा : धडेकर

आधुनिक केसरी न्यूज

**बाबूराव गोणारकर**

**धर्माबाद :** शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या नगरपालिकेच्या बाजूसच जुने न्यायाधीश भवन म्हणजेच जेज क्वार्टर पत्रकार भवनासाठी आरक्षित करा अशी वास्तववादी मागणी पत्रकारांच्या वतीने बहुभाषिक पत्रकार संघाचे अध्यक्ष गंगाधर धडेकर यांनी धर्माबाद नगरपालिकेच्या मुख्याधिकारी सौ. नीलम कांबळे यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केल्यामुळे पत्रकारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मिडीया ऊन, पाऊस,वारा यांची तमा न करता कठीण परिस्थितीत सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी काम करणाऱ्या पत्रकारांना निवारणासाठी पत्रकार भवनाची नितांत गरज आहे.धर्माबाद तालुक्यात पत्रकारांच्या विविध संघटना असून पैकी बहुभाषिक पत्रकार संघ, मराठी पत्रकार



संघ, धर्माबाद पत्रकार संघ, युवा पत्रकार संघ, संपादक व पत्रकार संघ अशा 5 पत्रकार संघटना असून पेक्षा 100 अधिक वर्तमानपत्राचे प्रतिनिधी काम करतात. वृत्त संकलन करून बातम्या लिहिण्यासाठी त्यांना घरी जावे लागते किंवा दुसऱ्या ठिकाणी बसून वृत्तांत लिहावे लागते. अशा धावपळीत त्यांच्या आरोग्याचाही प्रश्न उद्‌भवतो. अशावेळी पत्रकार भवन हे सर्व पत्रकारांसाठी आशेचा किरण आहे. जिथे शहरासह तालुक्यातील सर्व पत्रकार आराम करू शकतात. विचार विनिमय करू शकतात, सर्वसामान्यांच्या विकासासाठी वास्तववादी भूमिका ठरवू शकतात. पण आज घडीला पत्रकारभावनासाठी कुठलीही राजकीय व्यक्ती पुढाकार घेत नाहीत. शहराच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नगरपालिका कार्यालयाच्या शेजारीच असलेल्या जुने न्यायाधीश भवन ( जेज क्वार्टर ) हे पत्रकार भावनासाठी आरक्षित करा अशी वास्तववादी मागणी बहुभाषिक पत्रकार संघटनेच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे मुख्याधिकारी यांना केली आहे. ही मागणी तात्काळ मान्य व्हावी यासाठी मुख्याधिकारी ,प्रशासनाचे प्रतिनिधी तथा प्रशासक उपजिल्हाधिकारी यांनी पुढाकार घ्यावा अशा सर्व पत्रकारांच्या भावना आहेत.

तत्कालीन नगराध्यक्ष विश्वनाथराव पाटील बन्नाळीकर आणि विनायकराव देशमुख यांना पत्रकार भवनासाठी जेष्ठ पत्रकार संजय कदम यांनी दहा वर्षांपूर्वी लेखी निवेदनाद्वारे मागणी केली होती.

